Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

April 2022

Special Issue 05 Volume III (A)

# भारतीय लोकशाहीची वाटचाल
## (1947-2021)

**अतिथि संपादक**

**प्रा.के. एस. इंगळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा, जि. जळगाव

**प्रो. डॉ. वासुदेव सोमाजी वले**
प्रभारी प्राचार्य,
श्री. शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा, जि. जळगाव

Akshara Publication
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
April 2022 Special Issue 05 Volume III (A) SJIF Impact- 5.54

# Index



| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय लोकशाही आणि मराठी साहित्य प्रवाह | **प्रो. डॉ. वासुदेव सोमाजी वले** | **05** |
| 2 | भारतीय संविधान आणि लोकशाहीची वास्तवता | **प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे** | **11** |
| 3 | भारतीय लोकशाही व निवडणूकासंबंधीच्या तरतूदी | **प्रा.डॉ.ताराचंद माधव सावसाकडे** | **16** |
| 4 | भारतीय लोकशाही आणि मतदाराची उदासीनता | **प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे** | **21** |
| 5 | भारतीय लोकशाहीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | **प्रा.के. एस. इंगळे**<br>**डॉ. के. जी. पोकळे** | **24** |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय लोकशाहीचा सामाजिक अन्वयार्थ | **प्रा. डॉ. आर. बी वनारसे** | **27** |
| 7 | महात्मा गांधी आणि भारतीय लोकशाही | **डॉ. राजेंद्र सुभाष नाडेकर,** | **31** |
| 8 | भारतीय लोकशाहीचा इतिहास | **डॉ.भाऊसाहेब यशवंता जाधव** | **34** |
| 9 | आधुनिक विचारवंतांचे लोकशाहीबद्दल विचार – एक विवेचन | **प्रा. इंदिरा अशोक लोखंडे** | **36** |
| 10 | भारतीय लोकशाही आणि माहितीचा अधिकार | **दत्तात्रय पांडुरंग कातडे** | **39** |
| 11 | भारतीय लोकशाही आणि अर्थकारण | **अजय नामदेव गायकवाड** | **44** |
| 12 | भारतीय लोकशाही आणि स्त्री सबलीकरण | **राधा देविदास मोरे** | **47** |
| 13 | भारतीय लोकशाही व्यवस्थेत जात या घटकाची भूमिका | **अमोल सातपुते** | **50** |
| 14 | भारतीय लोकशाही आणि राजकिय पक्ष | **प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे** | **53** |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या श्रमिक उत्थानविषयक योजना :एक दृष्टिक्षेप | **अरविंद बाबूराव हटकर** | **56** |
| 16 | भारतीय लोकशाही आणि समाजसुधारक | **पांडुरंग सुदामराव दाभाडे** | **60** |
| 17 | भारतीय लोकशाहीची पार्श्वभूमी | **प्रदीप भगवान वाघ** | **62** |
| 18 | भारतीय लोकशाही आणि राज्यघटना | **प्रफुल्लसिंग सुवर्णसिंग राजपूत**<br>**प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर** | **65** |
| 19 | भारतीय संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी | **मरकंटे कौशल्या रामचंद्र** | **68** |
| 20 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे लोकशाही समाजवादाविषयी विचार | **रघुनाथ कौतिक सोनावणे**<br>**डॉ. विजय साहेबराव तुंटे** | **72** |
| 21 | भारतीय लोकशाही आणि कोरोना महामारी | **बळीराम शेषेराव चव्हाण** | **74** |
| 22 | भारतीय लोकशाही आणि माहितीचा अधिकार | **आदोडे श्वेता वैजनाथ** | **78** |
| 23 | भारतीय लोकशाही आणि राज्यघटना | **दिपाली वैजनाथ आदोडे** | **81** |
| 24 | तडवी भिल्ल जमातीच्या स्थलांतरीत कामगारांची स्थिती- विशेष संदर्भ जळगाव जिल्हा (कालखंड 2010-2015) | **प्रा.डॉ. श्रावण बाबुलाल तडवी** | **84** |
| 25 | औरंगाबाद जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ उदय आणि वाटचाल : एक अभ्यास | **निलेश संतोष जाधव** | **88** |
| 26 | भारतीय लोकशाही आणि राज्यघटना | **प्रा. अहिरे विलास सांडूजी** | **92** |
| 27 | भारतीय लोकशाही आणि ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती | **श्री. अधिकराव महारु पाटील** | **95** |
| 28 | भारतीय लोकशाही आणि माहितीचा अधिकार | **प्रा. गणेश गंभीरराव देशमुख** | **99** |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार | **रेखा राणोजीराव सौंदरमल** | **101** |

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

April 2022 Special Issue 05 Volume III (A) SJIF Impact- 5.54


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 30 | महात्मा फुले यांचे स्त्री स्वातंत्र्याबाबत विचार | **मनिषा शरद इंगळे** | **103** |
| 31 | स्त्री सक्षमीकरण | **उषा शरद इंगळे** | **105** |
| 32 | भारतीय लोकशाही व महिलांचे राजकिय सबलीकरण | **सुलभा नारायण भालेकर** | **107** |
| 33 | भारतीय लोकशाही आणि स्थानिक स्वराज्य संस्था | **नितीन माणिक पाटील** | **109** |
| 34 | भारतीय लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका | **प्रा.डॉ. तात्या बालकिसन पुरी** | **113** |
| 35 | भारतीय लोकशाही आणि स्त्री सबलीकरण | **विशाखा विजय वाघमारे** | **119** |
| 36 | आंबेडकरवाद आणि लोकशाही | **डॉ. ज्योती शरद इंगळे** | **122** |
| 37 | Democracy and Leadership in India | **Dr. Faruqui Mohammed Quayyum M. Younus** | **124** |
| 38 | A Study of Covid-19 in Maharashtra State, with Special reference to Aurangabad District | **Mr. Yogesh B. Puri** | **128** |
| 39 | Empowerment of women through political participation in India : An Overview | **Sampada Daulatrao Kharat** | **132** |
| 40 | A Study of the Role of Women and Democracy in India | **Savita Prabhakar Sadawarte,** | **134** |
| 41 | Democracy and Role of Political Parties in India | **Shaikh Gafoor Ahmed** | **137** |
| 42 | The Constitutional Safeguards for SCs and STs | **Babasaheb Kailas Jadhav<br>Dr. Umesh A. Gogadiya** | **141** |
| 43 | Role of election commission in Indian democracy – A critical study of electoral reforms of India | **Dr. Nilesh Rajendra Gadekar<br>Dr. Sachin Daulat Yelbhar** | **143** |
| 44 | भूमंडलीकरण के दौर में हिंदी | **डॉ. सैराज अन्वर तडवी** | **146** |
| 45 | मंजुल भगत के उपन्यास में स्त्री-विमर्श | **रजनी शरद इंगळे** | **148** |

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
April 2022 Special Issue 05 Volume III (A) SJIF Impact- 5.54

13

# भारतीय लोकशाही व्यवस्थेत जात या घटकाची भूमिका

**अमोल सातपुते**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग
एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया

---

**प्रस्तावना:**

भारतीय राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला वेगवेगळ्या घटकांनी प्रभावित केले आहे. त्यात धर्म, सम्प्रदाय, वंश, प्रदेश, भाषा, लिंग, दारिद्र्य, आणि जात या घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो. या वरील घटकांमुळे भारतीय समाज हा विखंडीत झाला आहे. या विखंडीकरणाच्या प्रक्रियेत सर्वात महत्वाची भूमिका जातीने बजावल्याचे आपणास दिसते. म्हणजेच या देशातील प्रत्येक धर्माच्या अनुयायामध्ये अनेक जाती व उपजाती आहेत. हिंदू, मुस्लीम, शीख, जैन व ख्रिश्चन या सर्व धर्मात जातीव्यवस्था आस्तित्वात आहेत. या जातीव्यवस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या जातीचे संघटन होण्यास मदत झालेली आहे. मात्र असे असले तरी या विविध जाती व उपजातीमध्ये सत्तेत वाटा मिळावा यासाठी संघर्ष व स्पर्धा असल्याचे दिसून येते. तसेच या देशातील राजकीय व सामाजिक वातावरण जातीव्यव्स्थेला पोषक ठरले आहे व ठरत आहे. भारताला स्वातंत्र्याच्या प्राप्तिनंतर जातीवादाचा नव्या रूपात प्रभाव निर्माण होण्यास सुरूवात झाली आहे. भारतात प्रौढ मताधिकाराच्या तत्वामुळे एक राजकीय शक्ती म्हणून जाती पुढे आल्याचे आढळते.

भारतीय लोकशाहीच्या स्थापनेनंतर जातीव्यवस्थेने इथल्या राजकारणाला आकार देऊन लोकशाही व्यवस्थेला नवीन आयाम प्राप्त करून दिला आहे. 'स्वातंत्र्यप्राप्तिनंतर भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या शिर्षस्थ नेत्यांची व घटनाकारांची अशी अपेक्षा होती की लोकशाही प्रक्रिया व औद्योगिकरण व आधुनिकतेच्या स्पर्शाने जातसंघटन कमकूवत होईल. तसेच प्रातिनिधिक लोकशाहीच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये औद्योगिकरणातून निर्माण झालेल्या सामाजिक वर्गाची भूमिका महत्वाची राहील. परंतू "भारताच्या लोकशाही राजकारणाच्या चौकटीत हितसंबंधांचे संघटन व अभिव्यक्तिकरणामध्ये जातीची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण राहिलेली आहे."[1]

भारतामध्ये स्पर्धात्मक राजकारणाचा आधार हा जात व जातसमूहच का? या प्रश्नाचा मागोवा घेतल्यास असे दिसून येते की भारतीय समाज हा विविध जातीमध्ये विभागल्या गेलेला आहे. जातीव्यवस्थेची काही वैशिष्ट्ये आहे. ज्यामुळे जातीधारित सामूहिक ओळख तयार होण्यास इथे वाव मिळतो. 'उतरंडीची संरचना, जातिनिहाय नियम, जातनिहाय सण-उत्सव आणि सांस्कृतिक विश्व, जात्यंतर्गत विवाह, जातवार वस्ती, जातवार व्यवसाय'[2] यामुळे प्रत्येक जातीची समान ओळख तयार होते तसेच 'ब्राम्हणश्रेश्ठत्व, अस्पृश्यता, शिक्षण, दर्जा आणि सम्पत्तीचे समान वाटप, सत्तेचे विषम वाटप'[3] यामुळे काही जातसमूहांना कायमची वंचना व काही जातसमूहांना कायमच्या लाभदायक गटामध्ये जाऊन पोहचते. अश्याप्रकारे व्यक्तीची सामुहिक ओळख, जातीवर आधारीत व्यक्तींचे हितसंबंध, जातीव्यवस्थेतील उच्च-निचतेच्या स्थानामुळे होणारे शोषण व त्यापासून प्राप्त सामुहिक वंचना व सामुहिक लाभ तसेच संविधान प्रद्दत्त समुहाधारित हक्क व सरकारी निर्णयप्रक्रियेत व्यक्तीचा अधिकाराइतकाच समुहाधारित अधिकाराला महत्व. यामुळे स्पर्धात्मक राजकारणाच्या चौकटीत जात व जातसमुहांना आपोआपच प्रवेश सूकर झाला. त्यातूनच मग जातीधारित राजकाणास प्रारंभ झाल्याचे दिसते.

"घटना समितीतील सदस्यांचा असा आशावाद होता की आधुनिक उदारमतवादी राजकाणात आणि समाजव्यवस्थेत जातीला स्थान नसेल, घटना समतीतील हा आशावाद आणि भौतिक दृष्टी यांचेच वर्चस्व स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकभरात राहिला"[4] नेहरूच्या विकासवादी राजकारणाने जातीच्या मुद्द्याला दुय्यम स्थानी ढकलले तसेच स्वातंत्र्यप्राप्तिनंतर सत्तरीच्या दशकापर्यंत कॉन्ग्रेस व्यवस्थेने सुद्धा जात आधारित राजकारणाच्या दुयमत्वाला हातभार लावला. एव्हाना स्पर्धात्मक निवडणूकीचे राजकारण प्रचलित झाले होते आणि स्पर्धात्मक राजकीय व्यवस्थेत आपले हितसंबंध पुढे रेटण्यासाठी संघटनात्मक व्यूहरचना विविध जातीचे गट वापरू लागले होते. त्याचबरोबर निवडणूकीच्या राजकारणात विविध समूह आपल्या मागे उभे करण्यासाठी प्रयत्न करताना 'जात' या घटकावरही राजकीय पक्ष भिस्त ठेवू लागले होते. जात हा घटक आधुनिक हितसंबंधाचा पाठपुरावा करण्यासाठी वापरला जाऊ लागला. वरवर पाहता जात हा आपल्या सार्वजनिक व्यवहारामधला एक मोठा हिस्सा राहिला पण

त्याच्या पारंपारिकतेपेक्षा आधुनिक समाज जीवनामधील त्यांची भूमिका जास्त महत्वाची राहिलेली आहे.[5] यातून जातीचे राजकीयकरण झाले. जातीचे राजकीयकरण जातीच्या धर्मनिरपेक्षीकरणाचे पहिले अंग आहे तर जातीचे कर्मकांडापासून मुक्त होणे हे जातीच्या धर्मनिरपेक्षीकरणाचे दुसरे अंग होय. [6]

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्येच निम्न जातसमूहांनी सामाजिक प्रतिष्ठा व अस्मितेचे प्रश्न राजकीय सत्तेतील भागीदारीच्या दावेदारीचे प्रश्न ऐरणीवर आणले. (उदा: महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आम्बेडकर, महर्षी विठ्ठल शिंदे, पेरियार रामास्वामी यांचे प्रयत्न) स्वातंत्र्य प्राप्तिनंतर किमान दोन दशके हे दावे काही प्रमाणात दुर्लक्षित राहिले परतू सत्तरच्या दशकानंतर निम्न समूहाकडून या संदर्भात गम्भीर आव्हाने उभे राहू लागले. याचे श्रेय खास करून आरक्षणाच्या धोरणाला द्यावे लागेल. सत्तरच्या दशकात शेतकरी दलित तसेच आदिवासी समूहांना त्यांच्या संख्यात्मक शक्तीचे भान हळूहळू येवू लागले. राजकीय सत्तेत हस्तक्षेप करण्यास ते पुढे सरसावले.

**मागास जातीच्या राजकारणाचा उदय:**

भांडवलशाही विकास, जमीन सुधारणा कार्यक्रम व हरितक्रांतीच्या कालखंडामध्ये मागसवर्गीय जातीगटांमध्ये एक सधन शेतकरी वर्गाचा उदय झाला. तसेच 'भारतीय राजघटनेत 1967 च्या निवडणूकीत उत्तरेतील अनेक राज्यांमध्ये कॉंग्रेसला धक्का बसला. त्यात या राज्यांमधील मागास जातींच्या नाराजीचा वाटा नक्कीच होता. अनेक ठिकाणी समानतर कॉन्ग्रेस गट उदयाला आले. भारतीय क्रांती दल या चरणसिंगाच्या पक्षाने उचल खाल्ले. कॉन्ग्रेसचे फुटीर गट, समाजवादी, भारतीय क्रांती दल आणि काही ठिकाणी जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्या स्वतंत्र पक्ष यांच्या संयुक्त आघाड्या बनल्या. त्या अल्पजीवी ठरल्या. येथून पुढच्या काळातील राजकारणात नवनव्या जातीय आघाड्या बनत राहिल्या. मात्र उच्च जाते प्रामुख्याने कॉन्ग्रेसबरोबर राहिल्या. बहुत्क राज्यांतील दलि आणि आदिवासी गटही कॉन्ग्रेसबरोबर राहिले'.[7] अश्याप्रकारे मध्यम शेतकरी जाती आणि इतर कनिष्ठ जाती यांचा मोठा समूह कॉन्ग्रेसपासून दूरावून आपले स्वतंत्र राजकारण करण्याच्या प्रयत्नांना लागला.

1977 नंतर मात्र काही गटांना जनता पक्षालाच या नव्या राजकारणाचे एक हत्यार बनवण्याचे प्रयत्न केले. विशेषता उत्तरप्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये या घडामोडी घडल्या. या राज्यांमध्ये मुख्यत: यादव जातीचे नेतृत्व पुढे आले. आणि त्यांनी मागासांच्या राजकारणाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेतला. सत्तेतील वाट्याबरोबरच शिक्षित तरूणांच्या दृष्टीने महत्वाचा असा नोकरीतील आरक्षणाचा मुद्दा पुढे आला. केंद्रातील सरकारला मंडल आयोगाला यामुळेच प्रतिसाद द्यावा लागला. आरक्षणाच्या मुद्द्यावरून उत्तरप्रदेश, बिहार या राज्यांत 1977-78 च्या दरम्यान तीव्र संघर्ष झाले. पुढे 1980 च्यादशकाच्या आरंभी गुजरातमध्ये या मुद्द्यावर दंगली-आंदोलने झाली. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या मुद्द्यावरून 1990 मध्ये भारतमध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष उभा राहिला.

**दलित राजकारणाचा उदय:**

डॉ. आंबेडकरांनी 1942 साली शेड्युल कास्ट फेडरेशन आणि स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि दलितांच्या राजकारणातील प्रवेशाचा मार्ग आखून दिला. पुढे दलित राजकारण हे प्रामुख्याने जातविरोधी राजकरणाचे केंद्र बनले. स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करून प्रथमच दलित चळवळीला राजकीय क्षेत्रात आणले. त्यानंतर बऱ्याच काळाने उत्तरप्रदेशात कांशिराम यांनी दलित जातीतील नोकरपेशा लोकांचे संघटन 'बामसेफ' या नावाने स्थापन करून दलित समाजामध्ये प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांचा आदर्श समोर ठेवून सरकारी नोकऱ्यातील जातीचे प्रमाण व आरक्षणाच्या संदर्भातील त्यांनी आपली धोरणे जाहीर केली. 1984 मध्ये त्यांनी बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. या पक्षाला दलित व मागासवर्गियांचा पक्ष म्हणून मान्यता प्राप्त झाली. जमीन वाटपाच्या प्रश्नावर भर देऊन दलित राजकारण जातीच्या पलिकडे नेण्याचा प्रयत्न केला. साठच्या दशकानंतर दलित चळवळीने चांगलाच जोर धरला होता. परंतू निअवडणूकींचे राजकारण, त्यात आलेले अपयश आणि समाज परिवर्तनाला गती देण्याऐवजी राजकीय स्वार्थासाठी केलेला दलित चळवळीचा वापर यामुळे दलित चळवळीचे राजकारण पुढील काळात फारसे पुढे गेले नसल्याचे दिसते.

**हिंदुत्वाचे राजकारण:**

कॉंग्रेसव्यवस्था पडझडीच्या काळात उदयाला आलेले हिंदुत्वाचे राजकराणाने सध्या काळातील जातीच्या राजकारणाला काही प्रमाणात निष्प्रभ केल्याचे दिसते. गेल्या दोन दशकात भाजपची वाढलेली ताकद आणि 2014 व 2019 च्या लोकसभा निवडणूकीत भाजपाच्या हाती आलेली केंद्राची सत्ता यामुळे हिंदुत्वाच्या राजकरणाचे स्थान भारतीय राजकारणात मध्यवर्ती ठरलेले आहे. कॉन्ग्रेसला पर्याय म्हणून भाजपाने सतत प्रयत्न केल्याचे दिसते. 'सत्तरीच्या दशकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कर्मठ, सनातनी

भूमिका बाजूला ठेवून आधुनिक हिंदुत्वाचा पुरस्कार केला. हिंदूसारख्या विस्कळीत, विविधतापूर्ण आणि खंडप्राय भूप्रदेशात पसरलेल्या जातीबद्ध समाजाला राजकीय दृष्ट्या संघटीत करण्यासाठी हिंदुत्व भावनिक आवाहन करणे. एक अखिल भारतीय समाज कल्पिण्याचा प्रकल्प हिंदुत्वाच्या राजकारणातून पुढे येतो. त्यामाध्यमातून हिंदूंचे एकीकरण करण्याचे प्रयत्न भाजप व संघपरिवाराकडून केल्याचे वारंवार आढळते. 1980 नंतर भारतामध्ये औद्योगिक व भांडवली विकासाद्वारे जो मध्यमवर्ग भारतात तयार झाला, त्या मध्यमवर्गामध्ये भाजपाचा मोठ्याप्रमाणात प्रभाव असल्याचे दिसते.'[8] 2014 व 2019 च्या लोकसभेच्या निवडणूकीत विकास व हिंदूत्वाच्या मुद्द्या आधारे भाजपाने भारतीय जनमाणसाला आवाहन केले. त्या आवाहनाचा परिणाम म्हणून आज भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रामध्ये दिसून येते. हिंदूत्वाच्या राजकारणाच्या रेट्यात जातीचे राजकारण मागे पडत असल्याच्या भारतीय लोकशाहीचा अनुभव राहिलेला आहे. जातीच्या राजकारणाने डोके वर काढले की हिंदुत्वाच्या राजकारणाची पिछेहाट होते.

**समारोप:** स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानची अंमलबजावणी, संविधानात मागास जातीसाठी असलेल्या संरक्षणात्मक तरतुदी, लोकशाही प्रक्रिया व निवडणूकीय राजकारण, प्रौढ मताधिकार यामुळे जात व राजकारणाचा घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाल्याचे दिसते. या परस्परव्यापी संबंधामुळे मुळच्या जातींच्या लक्षणामध्ये बराच बदल घडून आल्याचे दिसते. आधुनिक काळामध्ये जात व व्यवसाय यातील परस्पर संबंध बदलल्याचे दिसते. असे असले तरी कनिष्ठ समजल्या गेलेल्या जातींचे प्रतिनिधित्व अजूनही उच्च व्यावसायिक क्षेत्रात कमीच असल्याचे सुद्धा दिसून पडते. भारतीय राजकीय व्यवस्थेत जातीन मतदान वर्तन, राजकीय पक्षाचे स्वरूप, राजकीय संगठन व राज्याचे राजकारण ई. ला चांगलेच प्रभावित केलेले आहे. जातीचे संगठीत स्वरूप बघता राजकीय पक्षांनी निवडणूकीय राजकारणासाठी जातीचा प्रभावी वापर केला. राजकीय जागरूकता व जातीचे राजकारणातील स्थान याचा परस्पर संबंध आढळतो. जी जात राजकारणात ज्या प्रमाणात सक्रिय वा निष्क्रिय आढळते त्या प्रमाणात त्या जातीचे सदस्य जागरूक वा उदासीन असल्याचे चित्र भारतामध्ये दिसते. भारतीय राजकीय व्यवस्थेत मागास जातींच्या राजकारणाने लोकशाही व्यवस्थेला अधिक समावेशी केल्याचे सुद्धा दिसून पडते. लोकशाही, निवडणूकीय राजकारण व जात या परस्पर संबंधाने जातींच्या अंतर्गत संरचनेमध्ये बदल ज़ाल्याचे दिसून पडत असले तरी जातीने सुद्धा लोकशाहीला नवीन आकार देऊन जनसामान्यांमध्ये नव्या आकांक्षांना जन्म दिल्याचे आढळते.

**संदर्भग्रंथ**


1. चौबे कमलनयन, "जातीयों का राजनीतिकरण", वाणी प्रकाशन, नई दिल्ली, पृ. क्र. ३३
2. पळशीकर सुहास, 'समकालीन भारतीय राजकारण कॉन्ग्रेस वर्चस्व ते हिंदू वर्चस्ववाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १२६-१२८
3. उपरोक्त
4. आलम जावीद, 'लोकतंत्र के तलबगार', वाणी प्रकाशन, नई दिल्ली, पृ. क्र. ७२
5. शेठ धिरूभाई, 'नये मध्यमवर्ग का उदय' वाणी प्रकाशन, नई दिल्ली, पृ. क्र. ११४
6. उपरोक्त
7. पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र 'भारतीय लोकशाही: अर्थ व व्यवहार', डायमंड पब्लिकेशन, पुणे
8. सुमंत यशवंत, 'भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व: काही निरिक्षणे', विचारमंथन संशोधन पत्रिका, जानेवारी 2013, अंक 18, अथर्व प्रकाशन, जळगाव.


□ □ □

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor 2022: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - XLVIII Year – 7 Feb. 2022**

**Editor in Chief**

**Mrs. Pallavi Laxman Shete**
Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)
Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director**

**Mr. Tejas Rampurkar**
(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,
Taroda (KH), Nanded – 431605
(India -Maharashtra)
**Email:** Shrishprakashan2009@gmil.com
umbarkar.rajesh@yahoo.com
**Mob. No:** +91-9623979067



Scanned with CamScanner

# Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. S.V. Shivanikar**<br>Principal<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Deepak Dwarkadasrao Bachewar**<br>**Associate Professor**<br>Vasantrao Naik College, Vasarni, Nanded- (MH., India.) |
| **Dr. P. Neelkantrao**<br>Dept. of Economics, Pratibha Niketan Mahavidyalaya, Nanded. (MH., India.) | **Dr. Suhas Pathak**<br>Dept. of School of Media studies<br>S.R.T.M.U. Nanded. (MH., India.) |
| **Dr.Pramod Ravindra Deshpande**<br>Wake Forest School of Medicine,<br>Dept. of Cancer Biology,Winston Salem, NC, USA. | **Dr. Sachin G. Khedikar**<br>Principal & Professor,Dept. of Rachana-Sharir, Shri. O. H. Nazar Ayurved College, SURAT (India.) |
| **Dr Ashutosh Gupta**<br>Dept. of Sanskrit, HNB Garhwal University, Srinagar Garhwal Uttrakhand 246174 (India.) | **Dr. Mayuresh M. Rampurkar**<br>Sardar Vallabhbhai Patel Hospital,(Neurosurgery),Ahmedabad. (G.India.) |
| **Dr. Manish Deshpande**<br>N.S.B.College, Nanded. (MH., India.) | **Dr. Kulkarni J. N.**<br>Library sci.<br>S.R.T.M.U.Nanded. (MH., India.) |

# Co-Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. N. N. Bandela**<br>Dept. of Envi. Science<br>Dr.B.A.M.U. Aurangabad. (MH., India.) | **Dr. Suman K. S.**<br>Dept. of Oriental languages,<br>Loyola College,(Autonomous) Affiliated to University of Madras,Nungambakkam, Chennai-600034 (India.) |
| **Dr. S. P. Hangirgekar**<br>Dept. of Chemistry<br>Shivaji University, Kolhapur. (MH., India.) | **Dr. Baswaprabhu Jirli**<br>Dept. of Extension<br>Education, Institute of Agricultural Sci.<br>BHU, Varanasi. (India.) |
| **Smt. Martha B.**<br>Department of English, Dr. B.R. Ambedkar F.G. College, Ladgeri, Bidar, Karnataka (India.) | **Dr. Chandan Bora**<br>Dept. Of Commerce<br>(MH., India.) |
| **Dr. Mahesh Joshi**<br>Dept. Of Education<br>S.R.T.M.U. Nanded.(MH., India.) | **Dr. Mangesh W. Nalkande**<br>Dept. of Kayachikitsa<br>Govt. Ayurved College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Viraj Vilas Jadhav**<br>Professor and HOD, Dept. of Rachanasharir, Shri dhanwantry ayurvedic College and hospital sector 46 B CHANDIGARH. (India.) | **Dr. M.B. Kulkarni**<br>Govt. Medical College, Nanded. (MH., India) |




Scanned with CamScanner

## Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. U. D. Joshi**<br>Principal<br>Y. College, Ambajogai. (MH., India.) | **Dr. Vasant Biradar**<br>Principal<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Joshi Prashantkumar Panditdev**<br>Department of Zoology (Fishery Science) Adarsh College, Hingoli-431513 (MH., India.) | **Prof. Dr. Mahendrakumar Y. Kulkarni**<br>Head,Dept. of zoology<br>N.S.B. Colloege, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Bibhishan Kare**<br>Rrsearch Guide, Professor and HOD<br>Dept. of Sociology, NSB College, Nanded. | **Prof. Dr. Durgadas D. Choudhari**<br>Head Dept. of Economics<br>Mahatma Phule College, Ahmedpur. (MH., India.) |
| **Dr. Prashant Andage**<br>Dept. of Envi. Sci<br>Ratnagiri sub Center, Mumbai University(MH., India.) | **Dr. Sanjay S. Pekamwar**<br>School of Pharmacy,<br>SRTM University, Nanded (MH., India.) |
| **Dr. Shivraj G. Vannale**<br>School of Chemical Sciences<br>S.R.T.M.U. Nanded(MH., India.) | **Dr. Shashikant B. Dargu**<br>Dept. Of Sanskrit<br>N. S. B. College, Nanded(MH., India.) |
| **Dr. Sadavarte Rajesh K.**<br>Dept. of Computer,<br>N.S.B. College, Nanded. (MH., India.) | **Dr. Subhash T. Pandit**<br>Department of Economics,<br>S. V. Night College, Dombivli (E) (MH., India.) |
| **Dr. Kalpana Kadam (Bedre)**<br>Dept.of Political Sci., N.S.B. College,Nanded.(MH., India.) | **Dr. Vinay D. Bhogle**<br>Dept. of English Degloor College, Deglor(MH., India.) |
| **Dr. Deshpande R. P.**<br>Dept. Zoology<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani. (MH., India.) | **Dr. Sharada Bande**<br>Head, Dept. of History, S. S. Suryabhanji Pawar College, Purna (Jn.) (MH., India.) |
| **Dr.Kamble Ratnakar Ramrao**<br>Associate Professor, Dept.of Economics,<br>Sharda Mahavidyalaya, Parbhani(MH., India.) | **Dr. Gananjay Y. Kahalekar**<br>Mahatma Jyotiba Phule Mahavidyalay,<br>Mukhed Dist. Nanded. (MH., India.) |
| **Dr. Prashant G. Gawali**<br>Associate Professor, Dept. of Physics<br>Bahirji Smarak Mahavidyalya, Basmathnagar,<br>Dist. Hingoli (MH., India.) | **Dr. Vikas Kundu**<br>Geeta College of Education Butana(kundu),<br>Sonepat - Haryana |
| **Prof. K. Varalaxmi**<br>Deputy Director Sanskrit Academy,<br>Osmania University, Hyderabad. | |

## Advisor Committee

| | |
|---|---|
| **Dr. Milind V. Rampurkar**<br>Govt. Ayurved College, Mumbai. (MH., India.) | **Dr. Sudhir Kokare**<br>Nanded. (MH., India.) |
| **Dr. Sanjay G. Shirodkar**<br>Principal<br>Swa. Sawarkar College, Beed. (MH., India.) | **Prof. Dr. Chitanand M. P.**<br>Dept. Of Microbiology<br>N. S. B. College, Nanded. (MH., India.) |
| **Dr. Darmapurikar Bhalchandra V.**<br>Dept. of Political sci., NSB college, Nanded. (MH., India.) | **Dr. Ashish Divde**<br>Head Dept.of Envi.Sci,H.J.P.Mahavidyalaya,H.Nagar (MH., India.) |
| **Shri. Bidrkar**<br>Shivaji College, Parbhani (MH., India.) | **Dr. Anand R. Ashturkar**<br>Dept. of Envi. Sci. N.S.B.College, Nanded (MH., India.) |
| **Adv.Yadupat Ardhapurkar**<br>Law.,Nanded. (MH., India.) | **Dr. Karale Nagesh Baburao**<br>Saraswati Mahavidyalaya, Kaij Dist. Beed. (MH., India.) |
| **Dr. Nagesh R. Khadkekar**<br>SRTMU, Nanded. (MH., India.) | **Dr. Jeevan Pimpalwadkar (Marathi)**<br>Research Guide, SRTMU Nanded. (MH., India) |
| **Dr. A.I. Shaikh**<br>Associate Professor & Head, School of Social Sciences,<br>SRTMU, Nanded. (MH., India) | **Dr. Rajendr Jadhav**<br>Nanded. (MH., India.) |
| **Shri Bharat Jangam**<br>Director Jangam Academy, Nepal.. | **Dr. Jayanth Chapla**<br>Dept of Zoology Osmania University, Hyderabad. (India) |
| **Shri. Santkumar Mahajan**<br>Nanded. (MH., India.) | |



Scanned with CamScanner

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | APPROACH OF HOMEOPATHY IN MANAGEMENT OF NEPHROLITHIASIS | Dr. Ratnaparkhi P. M.<br>Dr. Padmashri Nilesh Samel | 01 |
| 02. | HOMOEOPATHIC MANAGMENT OF IRON DEFICIENCY ANEMIA IN CHILDREN: A REVIEW | Dr. Anagha Beedkar<br>Dr. Mahesh Kumar Samrite | 06 |
| 03. | EFFECTIVENESS OF HOMOEOPATHIC REMEDIES IN TREATING RENAL CALCULI – A CASE DISCUSSION | Dr. Suresh V. Tathe<br>Dr. Satwick Sistu | 09 |
| 04. | STUDY OF MARKETING FUNCTIONS IN PERISHABLE & NON-PERISHABLE COMMODITIES: CASE OF NANDED & PARBHANI DISTRICT | Abhishek O. Gill<br>Dr. G.P. Mudholkar | 14 |
| 05. | REVIEW ON SICKLE CELL ANEMIA: A CURRENT SCENARIO FROM DHULIA DISTRICT (M.S.), INDIA | S. S. PATOLE | 32 |
| 06. | "THE GENERAL ASPECTS OF HISTOMORPHOLOGY OF VIRUSES WITH THEIR HARMFUL AND HARMLESS EFFECTS" | Namrata Rajesh Dhanajkar | 38 |
| 07. | A COMPARATIVE STUDY OF PERSONALITY AMONG SECONDARY SCHOOL STUDENTS OF PRIVATE AND GOVERNMENT SECTOR | Dr. Manoj Kumar maurya<br>Gayatri Soni | 43 |
| 08. | REGIONAL PARTIES IN INDIA- ISSUES AND CHALLENGES | Hamsa Ramakrishna | 53 |
| 09. | CONTRIBUTION OF BUDDHIST THINKERS FOR THE WORLDSOCIETY: AN INTRODUCTION | Dr. SONAM ZANGPO | 60 |
| 10. | MULTICULTURALISM IN HARI KUNZRU'S *TRANSMISSION* | Mr. Mangesh Digambar Panchal | 66 |
| 11. | ROLE OF WOMEN IN FREEDOM MOVEMENT IN INDIA: STRUGGLE & OPPORTUNITY | Gurpinder Kumar | 70 |
| 12. | READING THE CHANNEL OF SKILLS | Dr. Chanchal Sharma | 76 |
| 13. | 'EFFECTS AND CHALLENGES OF ONLINE ADVERTISING' | Dharmendra Shakya | 79 |
| 14. | IMPORTANCE OF PHYSICAL EDUCATION & YOGA IN DAILY HUMAN LIFE | Dr. Ganesh S. Solunke | 81 |
| 15. | THE PORTRYAL OF INDIA AS | Jadhav Jaishree Shivajirao | 83 |




Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | NATION IN CRISIS IN ANANDMATH | | |
| 16. | महिला सशक्तिकरण : अवधारणा एवं चुनौतियाँ | डॉ. अनामिका प्रजापति | 87 |
| 17. | दुष्यन्त कुमार की ग़ज़लियत | रामलखन पाल | 91 |
| 18. | मराठवाडा मुक्ती संग्रामातील राणीसावरगाव परिसराचे योगदान | प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने | 99 |
| 19. | नॅक मुल्यांकित महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास | डॉ. घोगरे गोविंद सूर्यभान<br>प्रा. किर्दंत विलास गोपीनाथराव | 102 |
| 20. | राजर्षी शाहू महारांजांचे आर्थिक विचार आणि कार्य | वाघ जालिंदर पांडुरंग | 106 |
| 21. | भारतातील गरीबी व दूष्काळ एक चिंतन संशोधक | अमोल अशोक हिवराळे | 111 |
| 22. | शाश्वत विकासाच्या संदर्भात महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता | अमोल भा. सातपुते | 114 |
| 23. | भारतीय कीर्तन परंपरेचा विचार | श्री ह.भ.प.वसुदेव पाटलोबा मुंडे | 120 |
| 24. | भारतात करण्यात आलेले खाजगीकरणाचे प्रयत्न व त्याच्या अडचणी | श्री पंकज पुरुषोत्तम मानकर | 125 |
| 25. | माणगाव परिषद 20 मार्च 1920 ते 20 मार्च 2020 शताब्दी वर्ष | डॉ. विलास भारतराव बनसोडे | 129 |
| 26. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | *प्रा. डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे* | 132 |
| 27. | ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविकांच्या समस्यांचा अभ्यास.... संदर्भ - ता. शिरूर (का). | प्रा. सय्यद अफरोज अहेमद | 138 |
| 28. | रशिया युक्रेन युद्ध जागतिक अर्थव्यवस्थे वर परिणाम | डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर | 143 |




Scanned with CamScanner

# शाश्वत विकासाच्या संदर्भात महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता

**अमोल भा. सातपुते**
सहाय्यक प्राध्यापक ,राज्यशास्त्र विभाग, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया (महाराष्ट्र)

**गोषवारा:**

वर्तमान काळखंडामध्ये पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकास या संकल्पना जागतिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आल्याचे दिसते. मानव जातीच्या शांततापूर्ण आणि सर्वांगीन, शाश्वत, टिकाऊ व चिरकाल विकासाठी पर्यावरण संरक्षणाची अत्यंत गरज आहे. शाश्वत विकास ही बहुआयामी व परस्परावलम्वी संकल्पना आहे. या संकल्पनेत वर्तमान पिढीबरोबरच भविष्यातील पिढीचा विचार केला जातो. ही संकल्पना नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेक बुद्धीने व दूरदृष्टीने वापर करण्यावर भर देते. महात्मा गांधीनी आपल्या हयातीत शाश्वत विकास ही संकल्पना वापरात आणल्याचे दिसून येत नसले तरी त्यांच्या विचारांमध्ये मानव जातीची जी जीवनशैली रेखाटली आहे त्यामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकासाला पूरक धारणा दिसून येतात. या शोधलेखामध्ये शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन यासाठी गांधीच्या विचारांच्या योगदानाचा उहापोह करण्यात आलेला आहे, गांधींच्या विचारांची मिमांसा केलेली आहे. पर्यावरण प्रदुषण, निसर्गसौंदर्याची अवनती व हानी, वाढत जाणारी लोकसंख्या व त्यामुळे उर्जास्त्रोतांची उणीव, जीवसृष्टीतील प्राणी व वनस्पतींच्या जातींच्या नाश पर्यायाने पर्यावरणाचा विनाश या समस्यांवरील गांधींची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न या शोधलेखाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

**बीजशब्द:** शाश्वत विकास, पर्यावरण ऱ्हास, रचनात्मक कार्यक्रम.

**प्रस्तावना:**

वर्तमान काळात शाश्वत विकास ही संकल्पना विशेष लोकप्रिय झाली असून विकास व पर्यावरण यासंबंधीच्या अभ्यासात तिची मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसते. शाश्वत विकास ही संकल्पना तशी नवीन नाही. जगातील अनेक परंपरागत रूढिप्रिय समाजातील लोकांना शाश्वत विकासाची जाणीव असल्याचे दिसून येते. तथापि आर्थिक, सामाजिक विकासाचा ध्यास घेतलेल्या व आधुनिक म्हणविल्या जाणाऱ्या समाजातील लोकांना मात्र आर्थिक लाभाच्या हव्यासापोटी या संकल्पनेचे भान राहिलेले नाही. विकासाच्या अव्याहत चाललेल्या या जागतिक उपक्रमात पर्यावरणाचा ऱ्हास होऊन सम्पूर्ण जीवसृष्टीच्या आस्तित्वाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या संकटावर मात करण्याच्या विचारातून व प्रयत्नातून शाश्वत विकास या संकल्पनेचे आज महत्व दिवसेंदिवस वाढत असल्याचे दृष्टिक्षेपास पडते.

इतर प्राण्यांप्रमाणे मनुष्यदेखील आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक साधनसम्पत्तीवर अवलंबून असतो. पूर्वीच्या काळात मानवी लोकसंख्या व मानवी गरजा या मर्यादित होत्या. त्यांच्या तुलनेत नैसर्गिक साधनसम्पत्ती मात्र विपुल प्रमाणात उपलब्ध होती. त्यामुळे नैसर्गिक साधनसम्पत्तीची टंचाई भासणे, पर्यावरणाचा ऱ्हास होणे अशा समस्या भेडसावत नव्हत्या. आधुनिक काळात मात्र मानवी लोकसंख्या, मानवी गरज, मानवाची



Scanned with CamScanner

उपभोग वृत्ती किंवा लालसा व हव्यास इत्यादी गोष्टी प्रचंड प्रमाणात वाढल्याचे दिसते. जगातील बहुतेक समाजात विकासाचे कार्यक्रम सूरू झाले. विकासाच्या नावाखाली लोक स्वार्थी किंवा लोभी वृत्तीने नैसर्गिक साधनसम्पत्तीचा अविवेकी व अतिरेकी स्वरूपात वापर करू लागले. वसाहती, इमारती, रस्ते, लोहमार्ग, उद्योगधंदे, खाणी इत्यादीच्या उभारणीसाठी व शेती करण्यासाठी लोकांनी प्रचंड वृक्षतोड सूरू केली. अव्याहत विकासाच्या परिणामस्वरूप वाळवंटीकरण होणे, जैवविविधतेचा ऱ्हास होणे, हवा-जल-वायू प्रदूषण, जागतिक तापमान वृद्धी, समुद्राच्या पाण्याची पातळी उंचावणे, जंगले नष्ट होणे, परिणामी तेथील सजीवांचा अधिवास धोक्यात येणे अश्या समस्या तीव्र झाल्या. यामुळे नैसर्गिक समतोल ढासळू लागला. यालाच पर्यावरणाची अवनती वा ऱ्हास असे म्हणतात. या धोक्याची जाणीव जागतीक संस्था, संघटना, राज्यकर्ते, प्रशासक, विचारवंत, पर्यावरण प्रेमीमंडळी इत्यादींना झाली. या जाणिवेतूनच मानवी गरजांची पूर्तता करताना व विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्ती पुढील पिढ्यांसाठी टिकून राहिली पाहिजे, विकास हा पर्यावरणाचा ऱ्हास करणारा नसावा, तर तो सर्वांचे कल्याण करणारा व पिढ्यानपिढ्या टिकून राहणारा असावा अश्याप्रकारे विचार मांडले जाऊ लागले. या विचारातूनच शाश्वत विकासाची संकल्पना पुढे आली. शाश्वत राहाणे म्हणजे सतत सूरू राहाणे किंवा टिकून राहाणे असा अर्थ आहे. त्यानुसार शाश्वत विकास म्हणजे सतत सूरू राहणारा किंवा टिकून राहणारा विकास होय. जे सूरू राहू शकत नाही म्हणजेच खंडीत होते ते अशाश्वत होय. याउलट जे सुरू राहू शकते म्हणजे अखंडित राहाते ते शाश्वत होय. शाश्वत विकास म्हणजे अखंडपणे सुरू राहणारा वा टिकून राहणारा विकास होय.

### महात्मा गांधी व शाश्वत विकास

महात्मा गांधींच्या काळात शाश्वत विकाससबंधीच्या समस्या अस्तित्वात नसताना सुद्धा त्यांच्या यासंबंधीच्या कल्पना महत्वाच्या होत्या आणि आजही त्या तितक्याच महत्वाच्या आहेत. गांधींनी कधीही शाश्वत विकासाचा कोणताही परिपक्व सिद्धांत मांडला नाही. गांधींच्या अनेक लेखननोंदी, भाषणे आणि विचारमंथनातून त्यांच्या कल्पनेतील शाश्वत विकासाची तात्विक-सैद्धांतिक मांडणी समजून घेणे आवश्यक आहे. गांधीप्रणीत शाश्वत विकासामध्ये गांधींची समग्रतामूलक दृष्टी, स्वयंपूर्णता, आत्मनिर्भरता, स्व-नियंत्रण, स्वाधिनता आणि सर्वोदय या बाबी समाविष्ट आहेत. गांधींच्या लेखी शाश्वत विकास म्हणजे व्यक्तिचा शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकास म्हणजेच संतुलित विकास होय. हे संतुलन धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांतील संतुलन आहे असे गांधी म्हणत. मानवाने कामवासना, भावनिक अतिरेक आणि लालसेवर नियंत्रण ठेवल्यास ते पर्यावरणाच्या शाश्वत विकासाठी महत्वाचे ठरते असे गांधी म्हणतात.[1] गांधींच्या मते शाश्वत विकासाचा संबंध परिस्थितिकी-पर्यावरण संतुलनाशी आहे. या अनुषंगाने माणसाने शाकाहारी असावे ही गांधीची सूचना अत्यंत महत्वपूर्ण आहे. शाकाहार हा परिस्थितिकी-पर्यावरण संतूलन कायम राखण्याचा महत्वाचा मार्ग ते मानतात.[2] निकोप मानवी सहअस्तित्व आणि प्रजाती व पशूंच्या अस्तित्वाच्या हेतूने मानवाने सजीवांचे आणि निसर्गाचे संरक्षण करणे आवश्यक आहे असे गांधींचे मत होते. गांधीप्रणित शाश्वत विकास केवळ पर्यावरण विकासाशी संबंधित नाही तर यामध्ये सर्वसाधारण आर्थिक- सामाजिक विकास आणि नैतिक मूल्ये व नीतितत्वांशी संबंधित मानव विकास अंतर्भूत आहे.

मानवी स्वार्थ, अहंकार, लालसा आणि प्रत्येक परिस्थितीत अधिकाधिक लाभाचा विचार करणे हे पर्यावरण अवनतीचे प्रमुख कारण होय. भांडवलवाद आधारित विकास प्रक्रियेत मानव स्वार्थी झाले तरी निसर्गत: प्रत्येक



Scanned with CamScanner

मानव सदाचरणी आणि काही प्रमाणात नैतिक देखील असतो. गांधींच्या मते शाश्वत विकास म्हणजे सर्वंकष विकास होय. यामध्ये मानवी जीवन आणि मानव-निसर्ग परस्परसंबंध यांबाबत अनेक पैलू समाविष्ट आहेत.

**शाश्वत विकासाच्या संदर्भात गांधींची समग्रतामूलक दृष्टी:**

महात्मा गांधी यांच्याकडे कोणती पर्यावरण दृष्टी होती का? किंवा महात्मा गांधींनी पर्यावरणाकडे बघण्याची कोणता दृष्टीकोण आत्मसात केलेला होता? या आधारावरच गांधींच्या पर्यावरण व तदनुषंगाने शाश्वत विकासासंबंधीची धारणा स्पष्ट होऊ शकते. गांधींचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्याकडे असलेली 'समग्रतामूलक दृष्टी' (Integrated Approach). त्यांच्यासाठी जीवन म्हणजे एकप्रकारची समग्रता होय.[3] जीवनाचा आधार व त्या जीवनाचे नियमन करणारे तत्व एकच आहे अशी गांधींची धारणा होती. ते मानव व मानवेतर जगताकडे एकत्वाच्या दृष्टीने बघायचे. ते मनुष्याला प्रकृतीचा स्वामी न मानता, प्रकृतीचा एक अंग समजायचे. त्यामुळेच त्यांच्यासाठी निसर्ग हा उपभोगाचे साधन म्हणून कदापिही नव्हते. गांधी मनुष्य व मनुष्येतर जगताच्या समान अधिकारांचा सहर्ष स्विकार करून म्हणतात की, " मी हे अवश्य मान्य करतो की या ईश्वराच्या सृष्टीमध्ये जगण्याचा जेवढा हक्क आम्हाला आहे तेवढाच हक्क अन्य प्राणीमात्रांसुद्धा आहे"[4] यावरून असे लक्षात येते की गांधींना ही सृष्टी सर्व प्राणीमात्रांसाठीची असून प्रत्येकाला जगण्यात समान हक्क आहे. त्यामुळे मनुष्याला असा कुठलाही अधिकार प्राप्त होत नाही की त्याने या सृष्टीवर अधिकार गाजवावा. हा एक महत्वपूर्ण पर्यावरणीय दृष्टीकोण आहे, जो गांधींनी आम्हाला दिला. मनुष्य सृष्टी, जीवसृष्टी, निसर्ग, समाज आणि विवेकक्षम मणूस ही एक परस्परसंबंधित व्यवस्था आहे या धारणेतून गांधींनी मानवी व्यवहारांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला.

**हिंद स्वराज व गांधींची शाश्वत विकासाची धारणा:**

गांधीजींचे शाश्वत विकासासंदर्भातील विचार त्यांच्या हिंद स्वराज या पुस्तकातून व विकेंद्रीकरण, रचनात्मक कार्यक्रम, ग्रामोद्योग, खादी आणि स्वदेशीचा वापर तसेच अहिंसक समाजरचनेच्या आराखड्यातून दिसून येतो. गांधीजींनी शाश्वत विकास या शब्दांचा कुठेही वापर केल्याचे दिसत येत नसले तरी त्यांच्या विचारांमध्ये शाश्वत विकास संकल्पनेला पूरक विचार जागोजागी आढळतात. त्यांनी मानव जातीची जी जीवनशैली रेखाटली, एक आदर्श राज्यव्यवस्था वा अहिंसक समाजव्यवस्था कशी असावी यासंदर्भात जी मांडणी केली तसेच पाश्चात्य सभ्यतेची जी कठोर चिकित्सा केली त्यामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकासाला पूरक धारणा दिसून येतात. महात्मा गांधींनी लिहलेल्या हिंद स्वराज्य या छोटेखानी पुस्तिकमध्ये गांधींनी पाश्चिमात्य सभ्यतेवर, युरोपिय जीवनशैलीवर कडाडून टिका केल्याचे आढळते. 'हिंद स्वराज्य' चे मूळ लेखन गांधींनी नोव्हेम्बर 13 ते 22 दरम्यान इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेला येणाऱ्या 'किल्डोनन कासल' या आगबोटीवर गुजरातीत केले. ते डिसेम्बर 1909 मध्ये 'इंडियन ओपिनियन' च्या दोन अंका प्रसिद्ध झाले. हे पुस्तक खासकरून संवादशैलीमध्ये लिहलेले आहे. सम्पादक व वाचक यामधील तो संवाद आहे. पाश्चात्य सभ्यतेच्या विकासात विनाशाजी बीजे आहेत अशी गांधींची धारणा असल्याचे दिसते. गांधी युरोपीय सभ्यतेवर कडाडून हल्ला करतात ते याच धारणेतून. युरोपीय भांडवली विकास हा निसर्गाच्या अपरिमित नुकसानीतून उभा राहिलेला असून हा विकास सम्पूर्ण मानवजातीला विनाशाकडे घेऊन जाईल असे त्यांचे त्याविषयीचे मत असल्याचे दिसते.



Scanned with CamScanner

**गांधींचा रचनात्मक कार्यक्रम व शाश्वत विकासाचे तत्व:**

गांधीचा रचनात्मक कार्यक्रम ही छोटेखानी पुस्तिका लिहलेली होती. 1941 साली युद्धकालीन कॉंग्रेसची रणनीती काय असावी हे ठरविण्यामाठी कॉन्ग्रेस वर्किंग कमिटीची बैठक निमंत्रित करण्यात आली होती. या बैठकिला उपस्थित राहण्यामाठी गांधी बार्डोलीला निघाले असता प्रवासादरम्यान ही पुस्तिका रचल्या गेली. त्यात त्यांनी साम्प्रदायिक व जातीय ऐक्य, शिक्षण, आरोग्य, स्वास्थ्य, ग्रामोद्योग, ग्रामिण विकास, सांडपाण्यची व्यवस्था या मूलभूत बाबींचा उहापोह केला. रचनात्मक कार्यक्रमांमूळे व्यक्ती समाजाच्या व्यापक व मूलगामी प्रश्नांशी जोडला जातो. गांधींचा रचनात्मक कार्यक्रम हा नागरी समाजाच्या क्षेत्रामध्ये विशिष्ट राजकीय दृष्टी, दिशा व मूल्यव्यवस्था घेऊन केलेला जाणीवपूर्वक हस्तक्षेप होता असे यशवंत सुमंत लिहितात.[5]

गांधींनी आपल्या रचनात्मक कार्यक्रमामध्ये शाश्वत विकासाच्या संदर्भात खालील मुद्द्यांवर अधिक भर दिल्याचे दिसते.

**1. विधायक कार्यक्रम: आर्थिक दृष्टी:**

निसर्गोपचार, स्वास्थ, आहारशास्त्रातील त्यांचे प्रयोग शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मानल्या गेले पाहिजेत असे आहेत. निसर्गोपचार, आहारशास्त्र याबाबतचे गांधींनी जे प्रयोग केले त्यातून ती आधुनिक वैद्यक, आहारपद्धती, आरोग्यसेवा याविषयी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतात.[6] डॉक्टरांनी घेतलेल्या शुल्कावर कुठलेच निर्बंध का नसावे? ते माणसाच्या एकूण स्वास्थाविषयीचे सम्पूर्ण मार्गदर्शन का करीत नाहीत? आरोग्य, औषधोपचार, व स्वास्थाच्या सामाजिक आयामांचा विसर का पडतो? उत्तम आरोग्य सेवा गरीबातल्या गरीब माणसाला का उपलब्ध होत नाही? मूळात हा त्यांच्या पेश्यावरील टिका नाही. तर अनुत्पादक सेवांमधून प्राप्त होणाऱ्या मिळकतीची कमाल मर्यादा किती असावी, याचा कधीतरी विवेकी विचार माणूस करेल का असा प्रश्न ते विचारू पाहात आहे. गांधींनी कमीतकमी खर्चाचा पण आरोग्यदायी आहार काय असतो याचा बारबारकाईने विचार केलेला दिसतो. आहारामध्ये साखरेपेक्षा गूळ, लिम्बापेक्षा चिंच, कोंड्यासहित गव्हाचे पिठ, हातसडीचे तांदळ यांच्या वापराबाबत ते आग्रही आहेत. गांधी यातून गरीबानूकूल सत्वयुक्त आहाराचे अर्थशास्त्रच सांगत आहे.[7]

**2. शाश्वत विकासामध्ये उत्पादनसंबंधीच्या ग्रामीण पुनर्रचनेची भुमिका:**

ग्रामीण पुनर्रचनेकडे गांधी लोकशाही विकेंद्राकरणाच्या दृष्टीकोणातून बघतात. कम्युनिटी लाईफचे आकर्षण म्हणूनही आपण त्यांच्या या विचारांकडे पाहिले पाहिजे. वास्तविक गांधींचा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम हा उत्पादनसंबंधीची फेररचना करण्याचा क्रांतीकारी कार्यक्रम म्हटल्या गेले पाहिजे.[8] गांधींच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमात जमिनीवर आधारीत उत्पादसंबंधीची पुनर्रचना, ग्रामीण उद्योग व ग्रामीण रोजगार. आरोग्य, शेतीनिष्ठ अर्थकारण, श्रमप्रधान उत्पादन या सर्वांचा विचार केला. गांधीचा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम पर्यावरणकेंद्री मानल्या गेला पाहिजे.

**3. शाश्वत विकास व ग्रामोद्योग संकल्पना:**

गांधीच्या मते, शाश्वत विकासाच्या संदर्भात स्थिर प्रगती आवश्यक मानतात. अशी स्थिर प्रगती कशी साध्य करता येईल? तर ग्राम व कुटीरउद्योगच्या माध्यमातून विकास हेच त्याचे उत्तर राहिल असे ते म्हणतात. लाभाचे



Scanned with CamScanner

प्रमाण वाढवणे हे कुटीरउद्योगाचा उद्देश्य नसतो. असे उद्योग आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य नसले तरी सामाजिक दृष्ट्या व्यवहार्य आहे. कारण याद्वारे कमी प्रमाणात का होईना पण समाजातील श्रमिकांना सतत रोजगार उपलब्ध होत असतो. अशा स्थानिक पातळीवरील देशी उद्योगांच्या विकासामुळे नफ्याचे प्रमाण जरी वाढले नसले तरी रोजगाराचे प्रमाण वाढेल. विकास शाश्वत होण्यासाठी लोकांना किमान मूलभूत गरजांची पूर्तता करण्याइतका रोजगार मिळावा अशी गांधींची अपेक्षा होती.

"दळणे, कांडणे, साबण, कागद व आगपेट्या तयार करणे, कातडी कमावणे, तेल काढणे इत्यादि ग्रामोद्योगाशिवाय खेड्याचे अर्थकारण सम्पूर्ण होणार नाही. खेड्यात बनलेल्या वस्तूंना मागणी उत्पन्न झाली तर आपल्या बहुतेक गरजा आपली खेडेच भागवतील यांत काही संशय नाही आपली मनोवृत्ती ग्रामोन्मुख झाली पाहिजे म्हणजे पश्चात्यांचा नकलेच्या किंवा यंत्रांनी बनवलेल्या वस्तु हव्याश्या वाटणार नाही."[९] असे गांधी रचनात्मक कार्यक्रमावर भाष्य करताना म्हणतात.

**4. स्वच्छता व शाश्वत विकासाचा सहसंबंध:**

गांधींसाठी स्वच्छतेचे स्थान सर्वोच्च आहे. आपल्याला खेड्यांना सर्व प्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमूने बनविता आले पाहिजे असे गांधी म्हणत. राष्ट्रीय किंवा सामाजिक स्वच्छतेची जाणीव असणे हा आमच्यातला असणारा आवश्याक सदगुण मानला गेला पाहिजे. आपण कश्या तरी प्रकारचे स्नान करतो खरे परंतू ज्या विहिरीत, तलावांत किंवा नदीत किंवा ज्यांच्या काठी आपण स्नान वा धार्मिक विधि करतो ती घाण झाली तर आपल्याला त्याची पर्वा नसते. हा एक मोठा दुर्गुण मानल्या गेला पाहिजे. केवळ ग्रामसफाईचा उल्लेख केल्याने त्यांत आरोग्य व स्वच्छतेचा समावेश होऊ शकत नाही. स्वत:च्या आरोग्याचे रक्षण करण्याची कला आणि स्वच्छतेचे ज्ञान हा एक स्वतंत्र अभ्यासचा विषय आहे. मनुष्यजातीला जे अनेक व्याधींनी ग्रासलेलेले आहे त्यात आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करणे हे एक मुख्य कारण होय. आपली मने जर निरोगी झाली तर आपण सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करू आणि मग स्वाभाविकपणेच आरोग्याच्या नियमांचे पालन करू म्हणजे आपली शरीरे अनायासे निरोगी होतील. तुमचे पाणी, अन्न आणि हवा ही सर्व स्वच्छ व शुद्ध असली पाहिजेत आणि केवळ स्वत:पुरतीच स्वच्छता बाळगून समाधान न मानता जी त्रिविध स्वच्छता तुम्हाला स्वत:च्या बाबतीत पालावीशी वाटेल त्याच त्रिविध स्वच्छतेचा प्रचार आपल्या भोवताली लोकांनी करावे असे गांधी सांगतात.

**5. शाश्वत विकासासाठी खादीच्या वापरावर भर:**

गांधीच्या मते, खादी ही देशातील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या प्रारंभीची सूचक आहे. गांधी गरीबीच्या प्रश्नावरचा उतारा म्हणून खादी वर भर देतात. खादी म्हणजे सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती, जीवनाच्या सर्व गरजा भारतातूनच आणि त्याही खेड्यातील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करून भागविण्याचा कृतनिश्चय होय. शहरे खेड्यांचे शोषण व विनाश करतात असा त्यांचा समज होता. खादीच्या वापरामुळे खेडी बव्हंशी स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील आणि स्वेच्छेने दोन्ही पक्षांना लाभदायक होईल अश्या तऱ्हेने भारतातील शहरांच्या आणि बाहेरील जगाच्याही उपयोगी पडतील. खादी मनोवृत्ती म्हणजे जीवनाला आवश्यक अशा वस्तूंच्या उत्पादनाचे व विभागणीचे विकेंद्रीकरण होय. खादीच्या उत्पादनात कापसाची लागवड करणे, कापूस वेचणे, कापूस रेचणे, तो साफ करणे, पिंजणे, पेळू करणे, कातणे खळ देणे किंवा पाजणी करणे, रंगवणे, ताणावाणा



Scanned with CamScanner

करणे, विणणे आणि घूणे इतक्या गोष्टीचा समावेश होतो.[10] यातील एकूण एक क्रिया खेड्यात उत्तम तऱ्हेने होऊ शकते व यातून ग्रामीण भागात प्रत्येकाच्या हाताला रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

### 6. अहिंसा व प्राणीमात्रांच्या प्रति सहवेदना:

गाधींच्या मते, मनुष्याला निसर्गाचे वरदान प्राप्त झालेले आहे. परंतू निसर्गाला हानी पोहचविण्याचा कुठलाही अधिकर मनुष्यजातीला नाही. अहिंसा व सहवेदना केवळ जीवित प्राण्यांबद्दलच नव्हे तर जे निर्जीव व मृत पदार्थ आहेत त्यांच्या बद्दल सुद्धा ती सहवेदना असायला हवी असे गांधी सांगतात. भांडवली विकासासाठी नैसर्गिक साधनसम्पत्तीचा जो अपार वापर माणूस करतोय त्यामुळे जैववैविधता व पर्यावरणाची अपरिमित हानी होत आहे. त्यामुळे ही सहवेदना प्राणीमात्रांसोबतच निर्जीव वस्तुंप्रती सुद्धा असायला हवी असे गांधी सुचवितात.

### निष्कर्ष:

विकासाच्या संदर्भात गांधी सजग व सतर्क असल्याचे दिसून येते. भांडवलवादी विकासाच्या अंदाधुंद स्पर्धेमुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकते याची त्यांना सखोल जाणीव होती. विकासाचे वर्तमान प्रारूप अनेक समस्यांना जन्म देईल असा त्यांचा दृष्तीकोण होता. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, 'विकासाच्या अनुषंगाने युरोपीय लोकांनी बाळगलेल्या विकास प्रारूपाचा पुनर्विचार व्हायला हवा. युरोपीय पश्चिमी सभ्यतेने माणसाला माणासूपासून दूर केल्याचे गांधी नमूद करतात.' यावर उपाय म्हणून स्वत:च्या गराजांवर नियंत्रण ठेवून त्या मर्यादित करणे हाच एकमेव उपाय गांधी सुचवितात. मनुष्य आपल्या गरजा ज्या प्रमाणात वाढवितात तितक्याच प्रमाणात माणूस दुसऱ्यांवर हक्क बजाविण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या6चा हक्क याचा अर्थ शेवटच्या माणसाला दूर सारणे होय ज्यांचा सर्वाधिक अश्या संसाधनांची गरज आहे. गांधींचा पर्यावरणवाद नैतिक सिद्धांतावर आधारलेला होता. गांधींचे आपल्या शरीर व बुद्धीवर पुर्ण नियंत्रण होते. त्यांनी असा कोणताही संदेश दिलेला नाही जो त्यांनी आपल्या प्रत्यक्ष जीवनात अंमलात आणलेला नाही. 21 व्या शतकात गांधीजींनी सांगितलेल्या मार्गाचे अनुसरण केल्यास शाश्वत विकासाच्या धारणेला अधिक बळकटी प्राप्त होऊ शकते. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी नष्ट होऊ शकते. तसेच सर्वांना सम्मानजनक जीवनयापनाची साधने उपलब्ध होऊन येणाऱ्या पिढ्यांसाठी भविष्यात ही संसाधने कायम ठेवू शकू.

### संदर्भ-ग्रंथ:


1. घोष, बी. एन., (2019), गांधीप्रणीत अर्थशास्त्राच्या पलीकडे, सेज प्रकाशन, न्यू दिल्ली.
2. उपरोक्त.
3. पांडेय, संदिप (2020), पर्यावरणीय अवक्रमण एवं गांधीजी का पर्यावरण चिंतन, Research Review International Journal of Multidisciplinary, Volume-5, issue-02
4. उपरोक्त.
5. सुमंत, यशवंत (2016), महात्मा गांधींची विचारसृष्टी: काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन, पुणे.
6. उपरोक्त.
7. उपरोक्त.
8. उपरोक्त.
9. गांधी, मोहनदास (1946), विधायक कार्यक्रम: त्याचे रहस्य व स्थान, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद
10. . उपरोक्त.




Scanned with CamScanner

आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LVI, April 2022

- Editor -

**Mrs. Pallavi Laxman Shete**

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

CamScanner

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - LVI Year – 7 April 2022**

**Editor in Chief**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)

Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director**

**Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,
Taroda (KH), Nanded – 431605
(India -Maharashtra)

**Email:** Shrishprakashan2009@gmil.com
umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067



CamScanner

# INDEX



| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | PERCEPTION OF ADOLESCENTS REGARDING FOOD CONSUMPTION, SKIPPING MEALS AND BODY IMAGE | Dr. Chetana Vishwanathrao Donglikar | 01 |
| 02. | SUSTAINABLE DEVELOPMENT AND EMPOWERMENT OF WOMEN THROUGH AGRICULTURE: OPPORTUNITIES AND CHALLENGES | Gurpinder Kumar | 08 |
| 03. | ECO-TOURISM AND ITSPROSPECTS: A STUDY OF WATERFALLS IN TELANGANA STATE | Dr. INDIRA P. | 15 |
| 04. | DETERMINANTS OF VOTING BEHAVIOUR OF PEOPLE IN INDIAN POLITICAL SYSTEM- A LITERATURE REVIEW | K. V. MANJUNATHA | 23 |
| 05. | VITILIGO AND HOMEOPATHY | Dr. Toofan Chakravorty<br>Dr. Vaishali Ram Pangarkar | 32 |
| 06. | SIR ROGER DE COVERLY A CHARACTER PAR EXCELLENCE | Mundhe Dilipkumar Shivajirao | 36 |
| 07. | ऑनलाइन शिक्षा: चुनौती और संभावनाएं | किरन यादव | 38 |
| 08. | उदयन – वासवदत्ता | डॉ. मनीषा सिन्हा | 40 |
| 09. | बौद्ध शिक्षा की प्रासंगिकता वर्तमान वैश्विक परिप्रेक्ष्य में | डॉ. ममता धाकड़ | 47 |
| 10. | देशी – विदेशी वाद | डॉ. बी. व्ही. डोंगरे (पाटील) | 51 |
| 11. | स्वातंत्रपुर्व काळातील शेतकरी चळवळीमध्ये महात्मा गांधींच्या भूमिकेचे अध्ययन | अमोल सातपुते | 54 |
| 12. | पानिपतच्या इतिहास प्रसिध्द लढाया-एक दृष्टिक्षेप | प्रा. शिवचरण एन. धांडे | 57 |
| 13. | २०२१-२०२२ आणि २०२२-२०२३ या वर्षातील भारताच्या संरक्षण खर्चाची तुलना | प्रा. डॉ. धनंजय केशवराव पाटील | 64 |
| 14. | महात्मा गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता | सहा प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव | 74 |
| 15. | मराठवाडा मुक्तीसंग्राम : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. सूर्यकांत दिगंबर सावंत | 76 |





CamScanner

# स्वातंत्र्यपुर्व काळातील शेतकरी चळवळीमध्ये महात्मा गांधींच्या भूमिकेचे अध्ययन

अमोल सातपुते
सहाय्यक प्राध्यापक, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अनन्यसाधारण आहे.. त्यामुळे शेती हा आजही भारतीयांचा एक प्रमुख व्यवसाय आहे. भारतीय लोकसंख्येतील अधिकांश जनता कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेतील एक मूलभूत घटक आहे. भारतातीत शेतकरी चळवळींना स्वातंत्र्यपुर्व काळातील जहागीरदार व जमीनदार यांच्या विरोधाची किनार आहे. पूर्वी स्वयंपुर्ण ग्रामीण व्यवस्था भारतात होती. परंतू ब्रिटीशांच्या व्यापारीकरणाच्या धोरणामुळे आणि हस्तउद्योग बंद पडल्यामुळे ग्रामीण शेतकरी फक्त शेतीवरच उपजीविकेसाठी अवलंबून होता. ग्रामीण भागातील जनतेची विशेष करून शेतकरी वर्गाची ताकद महात्मा गांधीनी ओळखली. शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती, मूलभूत नागरी व मानवी हक्क यासाठी ही आंदोलने 1920 नंतर देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला एक व्यापक जनाधार देणारी ठरली. त्यांनी शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीयांना एकत्र करून लढे उभारले. खरा भारत ग्रामीण भागात आहे हे ओळखून शेतकऱ्यांच्या प्रश्नांमध्ये विशेष रस घेऊन त्यांचे असे काही लढे लढविले की ज्यामुळे शेतकरी वर्ग स्वातंत्र्य आंदोलनाच्या राष्ट्रीय चळवळीकडे सुद्धा आकृष्ट झाला. शेतकरी चळवळी मधून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय भावना जागृत झाली. तसेच त्यांना स्वत:च्या प्रश्नांबद्दल भान निर्माण झाले. त्यामुळे त्यापुढील राष्ट्रीय चळवळीच्या वेगवेगळ्या पर्वात ग्रामिण भागही मोठ्या प्रमाणात सहभागी झाला. या कारणास्तव स्वातंत्र्यपुर्व काळातील शेतकरी चळवळीमध्ये महात्मा गांधींच्या भूमिकेचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

## 1. चंपारण सत्याग्रह- बिहार (1917-18)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधी युगाचा प्रारंभ खऱ्या अर्थाने या चळवळीमुळे झाला. चंपारण्य हा बिहारचा वायव्येकडील जिल्हा. तेथे निळीची लागवड होत असे. ब्रिटीश राजवटीच्या स्थापनेनंतर तेथे इंग्रज मळेवाल्यांनी आपले साम्राज्य स्थापन केले. युरोपीय मळेवाले नीळ लागवडीसाठी भारतीय शेतमजूर व शेतकऱ्यांना अमानुष व बेकायदेशीर पद्धतीने व अत्यल्प मजूरीवर राबवून घेत. या अन्याय व पिळवणीकीविरूद्ध गांधींनी चंपारणच्या शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांचा लढा उभारला. ज्या पद्धतीने युरोपीय मळेवाले कुळांना जबरदस्तीने निळीची लागवड करण्यास भाग पाडत त्या अन्यायाला गांधींनी वाचा फोडली. अखेर लढ्याची दखल घेऊन सरकारला चौकशी समिति नेमावी लागली. या समितीने शेतकऱ्यांच्या मागण्यांची न्याय्यता मान्य केली व उपाययोजना सुचवली. नीळ लागवडीची सक्ती रद्द झाली.

वाह्यत: जरी चंपारणचा लढा युरोपीय मळेवाल्यांविरूद्ध असला तरी प्रत्यक्षात त्यात मळेवाल्याशी साटेलोटे असणाऱ्या राज्यकर्तांविरूद्ध असंतोष होता. गांधीजी चंपारण्यमध्ये केवल सत्याग्रहाचा प्रयोग करून थांबले नाही तर खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केला. अनेक कार्यकर्त्यांनी या कामी स्वत:ला वाहून घेतले. या भागात ज्ञानदानाचे कार्य सुरू झाले व हळूहळू सर्वसामान्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न गांधींनी केला. ही चळवळ महात्मा गांधींच्या सर्व चळवळीचा आरंभबिंदू होता आणि तिचा उद्देश लोकांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यावर होणारे अन्याय दूर करण्याचा होता. या चळवळीला उघडपणे राजकीय स्वरूप

दिल्या गेले नाही. या चळवळीने महात्मा गांधींनी चंपारणाच्या जनतेत निर्भयतेचे बीज पेरले व जनता मळेवाल्यांच्या विरूद्ध उभी राहू लागली. गांधींच्या प्रयत्नांमुळे मार्च 1918 रोजी चंपारण शेती कायदा सरकारने संमत केला व त्यानुसार तीन काठियांचे करार रद्द करण्यात आले. नीळ लावण्याच्या बंधनातून शेतकरी मुक्त झाला. तीन कठिया पद्धत रद्द केल्यामुळे मळेवाल्यांची मक्तेदारी संपुष्टात आली.

**2. खेडा सत्याग्रह- गुजरात (1919):**

1918 मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यामध्ये दुष्काळ पडला होता. दुष्काळामुळे पिके बुडाली असतानाही शासकीय अधिकारी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने शेतसारा वसूल करत असे. हे अन्याय नियमबाह्य होते. शेतकऱ्यांची मागणी होती की त्या वर्षाची महसूल आकारणी स्थगित करावी. गांधी व त्यांची कॉंग्रेसमधील इतर सहकारी यांनी त्या विभागाची पाहणी करून ही मागणी उचलून धरली. अधिकाऱ्यांनी ही मागणी फेटाळून लावली. तेव्हा गांधींनी पाटीदार शेतकऱ्यांना सत्याग्रह करण्यास प्रवृत्त केले. 2000 शेतकऱ्यांनी सार्वजनीक शपथ घेतली की आपण वर्षाचा शेतसारा भरणार नाही. त्यासाठी सरकारने कोणतीही कायदेशीर कृती केली तरी आपण ती सहन करू. 'येतील त्या हालापेष्टांना तोंड द्या, पण सारा भरू नका' या त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो शेतकऱ्यांनी गावोगावी एकत्र जमून इंग्रज प्रशासनाचा निषेध केला व सारा वसूलीस ठामपणे विरोध केला. तेव्हा इंग्रज सरकारने जूलुम जबरदस्ती केली. आंदोलन पाडण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांच्या शेतजमीनी, मालमत्ता यावर जप्ती आणली. जप्त केलेल्या शेतजमिनीतील पीक काढून घेतल्याबद्दल सरकारने अनेक शेतकऱ्यांना तुरूंगात डांबले. तरीही शेतकऱ्यांनी शांततापुर्ण मार्गाने सरकारचा निषेध करत हे आंदोलन सुरूच ठेवले. दिवसेंदिवस या सत्याग्रहाची व्याप्ती वाढू लागली. गुजरातमधील इतर जिल्ह्यातील शेतकरीही संघटितपणे इंग्रज सरकारचा निषेध करू लागले. अखेर इंग्रज सरकारने नमते घेऊन सारावसूलीत सूट दिली आणि नवी करवाढही रद्द केली. या सत्याग्रहात गांधीच्या बरोबर वल्लभभाई पटेल, ना. म. जोशी, शंकरलाल पारिख इत्यादी कॉंग्रेस नेते सामील झाले होते. या नेत्यांनी शेतकऱ्यांची सरकारी अधिकाऱ्याबद्दल असणारी भीती दूर केली.

**3. बार्डोली सत्याग्रह – गुजरात (1922):**

चंपारण व खेडा सत्याग्रहाच्या यशामुळे शेतकऱ्यांच्या राजकीय शेतकऱ्यांच्या जाणिवांत वाढ झाली होती. व ते राष्ट्रीय चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी होत होते. 1920 नंतरच्या राष्ट्रीय चळवळीच्या टप्प्यात कॉंग्रेसने कायदेभंगाची चळवळ सूरू करायचे ठरविले. या जनआंदोलनासाठी गुजरातमधील बार्डोली तालुक्याची निवड करून तिथे साराबंदीचे आंदोलन सुरू केले. सुरत जिल्ह्यातील बार्डोलीत 1928 मध्ये सत्याग्रह सुरू झाला. या सत्याग्रहात गुजरातेतील श्रीमंत व मध्यम शेतकरी असणारा पाटीदार समाज मोठ्या प्रमाणात सामील झाला होता. हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या कनिष्ठ जातींच्या शेतमजूर वर्गानेही आंदोलनात उतरविण्यासाठी गांधींनी 1923 सालापासूनच सुरत जिल्ह्यातील 'पाटीदार युवक मंडळाला' कनिष्ठ जाती व आदिवासींमध्ये चरखा, दारूबंदी इत्यादी रचनात्मक काम करण्यास प्रवृत्त केले. या रचनात्मक कार्यामूळे पाटीदार शेतकरी व कनिष्ठ जातींचे शेतमजूर एकत्र येऊन राजकीय कृती करण्याची तयारी झाली. मात्र रचनात्मक कार्यामुळे पाटीदार समाजाच्या पारंपारिक प्रभुत्वाला कुठेही धक्का लागला नाही. रयतवारी पद्धतीतील नियमित कालावधीनंतर होणाऱ्या सारावाढीबद्दल सरकारने निर्णय घेतला. या सारावाढीला विरोध करण्याचे पाटीदार शेतकऱ्यांनी ठरविले. ही साराबंदीची चळवळ जरी मध्यम व श्रीमंत हितसंबंधासाठी होती तरी ती यशस्वी आंदोलनही केले.



CamScanner

**निष्कर्ष:**

गांधींच्या नेतृत्वाखाली झालेले चंपारण, खेड सत्याग्रह तसेच बार्डोली हे सत्याग्रह महत्वाचे ठरल्याचे दिसते. एका परीने शेतकऱ्यांच्या चळवळीला या सत्याग्रहामुळे एक दिशा मिळाली. गांधीजींनी चळवळीद्वारे शेतकऱ्यांचे विविध प्रश्न हाताळले. मात्र त्याचबरोबर गांधीजींच्या विचारप्रणाली व कार्यपद्धतीमूळे या चळवळीवर काही महत्वाच्या मर्यादा सुद्धा पडल्याचे दिसते. गांधीजी अश्या चळवळी अहिंसक मार्गानेच चालेल याबद्दल दक्ष असत. पण परिणामस्वरूप असे दिसते की शोषित व ज्यांच्यावर अन्याय झाला आहे असे गटच या अहिंसेच्या तत्वाला बांधील राहत आणि पिळवणूक करणारे गट मात्र दडपणूक व हिंसा करण्यास मोकळे राहत. त्यांच्या बाबतीत गांधी हृदयपररिवर्तनाचा उपाय सुचवीत. गांधींनी शेतकऱ्यांच्या अश्याच प्रश्नांना हात घातला ज्यांचा संबंध थेट ब्रिटीश सरकारशी येईल. जमीन महसूल, शेतसारा, दुष्काळ निवारण किंवा कर इत्यादींचा संबंध सरकारशी होता व कृषीक्षेत्रातल्या इतर वर्गाशी नव्हता व दुसरी ज्या लढ्यामध्ये गरीब शेतकरी, कुळे, शेतमजूर हे त्यांची शोषण करणाऱ्या जमीनदार, श्रीमंत शेतकरी, व्यापारी किंवा सावकारींविरोधी उभे राहतील असे लढे गांधींनी टाळले. जेव्हा काही लढ्यांचा परिणाम म्हणून या प्रकारचे लढे सूरू झाले त्या वेळी गांधीजींनी चळवळी मागे घेतल्या. थोडक्यात, शेतकऱ्यांमधील वर्गीय हितसंबंधातील विरोध नष्ट करून परदेशी राज्यकर्त्यांविरोधी त्यांची एकत्रीत फळी तयार करण्याचा गांधींनी प्रयत्न केला. या चळवळी बांधताना राष्ट्रवाद आणि आर्थिक कल्याण यांची यशस्वी सांगड त्यांनी घातली. अनेक लोकांनी सत्याग्रहात स्वत:ला अटक करून घेतली. पण त्यामुळे व नंतरच्या खटल्यांमुळे अधिकच मोठ्या संख्येने शेतकरी या चळवळीकडे ओढले गेले. शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती निर्माण झाली. या आंदोलनाद्वारे देशातील खेड्यापाड्यांत पसरलेला शेतकरीवर्ग आणि राष्ट्रवादी विचारांचा विचारवंत वर्ग यांच्यात युती घडून आली. राष्ट्रवादी आंदोलन केवळ शहरी मध्यमवर्गापुरतेच मर्यादित न राहता त्यात शेतकरी व कष्टकरीजनांचा सुद्धा सहभाग वाढला. मात्र त्याचबरोबर ग्रामीण भागातील जमीनदार व पिळवणीकीविरुद्धच्या आंदोलनाचेही बीज रूजल्याचे दिसून पडते.

**संदर्भग्रंथ:**



1. सरकार, सुमित (2015) (अनु: सुशीला डोभाल): आधुनिक भारत 1885-1947, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.
2. गुहा रामचंद्र, (अनुवाद 2011), गांधीनंतरचा भारत, मॅजेस्टीक प्रकाशन, ठाणे.
3. सुमंत यशवंत, (२०१७), महात्मा गांधींची विचारसृष्टी: काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन,पुणे.
4. वेडकिहाळ, किशोर (संपा) (2005): परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, लोकवाङ:मय गृह, मुंबई.
5. जावडेकर, शं. द. (2001): आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे
6. तळवळकर, गोविंद (1997): सत्तांतर: 1947, खंड-3, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
7. फिशर, लुई , अनु: वि. रा. जोगळेकर (2019): महात्मा गांधी जीवन आणि कार्यकाळ, साधना प्रकाशन, पुणे




CamScanner

ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-21

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-21 July-Aug-2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*July-Aug-2022 Volume-2 Issue-21*

*On*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Executive Editor**
**Dr. Anant Balu Shingade**
Principal
Bharat Mahavidyalaya, Jeur (C.Rly)

**Editor**
**Dr. Arvind Vaman Dalavi**

**Co-Editors**

| | |
|---|---|
| Mr. Ramesh Vitthal Patil | Smt. Dr. Sunita Sripati Kamble |
| Dr. Shivaji Maruti Waghmode | Dr. Pandit Genappa Banne |
| Dr. Sanjay Pandurang Chaudhari | Mr. Shashikant Raghunath Waghmare |
| Mr.Tukaram Haribhau Aghav | Mr.Anil Madhukar Munguskar |
| Mr. Vasant Parshuram Yadav | Dr.Navnath Dagadu Gadekar |
| Mr. Suryavijay Baliram Jadhav | Mrs.Radha Ajinath Deshmukh |

**Published by-** P. R. Talekar, Secretary, Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**



CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-21 July-Aug-2022

## CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | नारायण सुर्वे यांची कविता : एक अभ्यास<br>नानकसिंग अमरसिंग साबळे | 1 to 5 |
| 2 | समाजषास्त्रात भाशेचे महत्व<br>डॉ. दिपा समीर बिरनाळे | 6 to 8 |
| 3 | नाविन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन कार्यानिती<br>Prof. Sushil Kumar, Asst. Prof Kirtikar Yogeshwar Shripal | 9 to 13 |
| 4 | भारतातील जैवविविधतेचा अभ्यास<br>प्रा .डॉ. राजाराम महादेव थोरात | 14 to 17 |
| 5 | डॉ. रमाकान्त सोनी : स्वातंत्र्योत्तर लोकसाहित्य में नारी चेतना और संवेदना का विकास<br>सरोजनी डड्सेना डॉ. रेखा दुबे | 18 to 23 |
| 6 | राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने व राज्याची भूमिका<br>अमोल भा. सातपुते | 24 to 28 |
| 7 | रासायनिक खतांचा वाढता वापर आणि मृदा परिक्षण काळाची गरज - यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक अध्ययन<br>कु. मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे) | 29 to 33 |
| 8 | मराठी साहित्यातील पर्यावरणीय दृष्टीकोन<br>डॉ. संतोष जबाजी लगड, डॉ. भारती मच्छिंद्र काळे | 34 to 36 |
| 9 | लघुउद्योगाच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे महत्व<br>भोसले पवनकुमार बाजीराव, डॉ. ढवण रावसाहेब प्रभाकर | 37 to 40 |
| 10 | आदिवासी कोळी समाज स्त्री चित्रण<br>प्रा. सौ. हेमलता यु. मुकणे | 41 to 44 |
| 11 | पर्यटन और पर्यावरण :- झारखण्ड के संदर्भ में एक आर्थिक अध्ययन<br>बबलू कुमार | 45 to 47 |
| 12 | शेतकरी कामगार पक्ष स्थापनेसाठी बहुजन नेतृत्वाचे योगदान<br>नागरगोजे प्रदिपकुमार बबन, प्रा.डॉ. विश्वनाथ महादेव आवड | 48 to 50 |
| 13 | "भाषिक संशोधन पद्धती एक अभ्यास"<br>प्रा डॉ श्रीहरी चव्हाण | 51 to 54 |
| 14 | विज्ञापन का भाषाई संदर्भ<br>प्रा. डॉ. नरसिंगदास ओमप्रकाशजी बंग | 55 to 56 |
| 15 | जनसंचार माध्यम और समाज<br>डॉ. पंडित बन्ने | 57 to 59 |
| 16 | उन्हाच्या कटाविरुद्ध व्दंव्द पुकारणारी नागराज मंजुळे यांची कविता<br>डॉ. संजय पाडुरंग चौधरी | 60 to 63 |
| 17 | लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याच्या समस्या<br>प्रा. मुंगूसकर अनिल मधुकर | 64 to 67 |
| 18 | सदानंद देशमुख यांची कादंबरी : ग्रामीण जीवनाचा दस्तऐवज<br>श्री. महावीर विठ्ठल उन्हाळे | 68 to 72 |
| 19 | स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवचरित्र( Life Biography of Swatantryaveer Savarkar )<br>प्रदीप गणेश झाडे | 73 to 78 |
| 20 | पारिवारिक नीति निर्धारकों की भूमिका में स्त्री और डॉ. बलदेव के साहित्य में स्त्री विमर्श<br>श्रीमती वंदना जायसवालए डॉ.स्नेहलता निर्मलकर | 79 to 82 |
| 21 | आफ्रिकन वसाहतवादाच्या प्रारंभिक स्थितीचे आकलन<br>श्री.आप्पा माणिक मराळ | 83 to 88 |
| 22 | दादरा आणि नगर हवेली जल संपदा व जलप्रदूषण: एक अभ्यास | 89 to 94 |




CamScanner

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने व राज्याची भूमिका

**अमोल भा. सातपुते**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया (महाराष्ट्र)
*Corresponding Author-* अमोल भा. सातपुते
Email ID: amolsatpute009@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052464

**गोषवारा:**

आपला देश विविध संस्कृतींचा देश आहे आणि म्हणूनच संपूर्ण जगभरात त्याच्या स्वतःची विशिष्ट ओळख आहे. भाषिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक विविधता असूनही, भारतीय लोक राष्ट्रीय एकता व सचोटी राखण्यात यशस्वी ठरले आहेत. भारत विविध संस्कृती, धर्म आणि समाज यांचे संगम आहे आणि हे सर्व धर्म आणि संप्रदायाचे समान दर्जा देते. या कारणास्तव, विविधता असूनही, शतकानुशतके देशाच्या नागरिकांच्यात एकीची भावना आहे. आम्ही नेहमीच एक उदार दृष्टीकोन स्वीकारला आहे आणि आम्ही सत्य आणि अहिंसा यांचा आदर करतो. भारतातील बहुसांस्कृतिक आणि बहु-जातीय वास्तववादी संस्कृती त्याच्या जातीय, सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेमध्ये आहे. इतके मोठ्या स्तरावर जगात इतर कुठल्याही देशांत सांस्कृतिक, धार्मिक, जाती आणि भाषा आणि बोली उपलब्ध नाहीत. अश्याप्रकारे प्रचंड विविधता असणाऱ्या या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हाने सुद्धा तितकीच कडवी आहेत. असे जरी असले तरी राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यामध्ये भारतीय राज्याची भूमिका महत्वाची ठरल्याचे दिसून पडते.

**बीजशब्द: राष्ट्र, राष्ट्रीय एकात्मता**

**प्रस्तावना:**

राष्ट्र या संकल्पनेत भावनीक एकात्मता अपेक्षीत आहे. भौगोलिकदृष्ट्या विशिष्ट असा जो भुभाग असतो त्याला देश असे म्हणतात. अर्थात देशांतर्गत सीमांमधील भुप्रदेशाचा मिळून देश तयार होत असतो. त्या भुभागात माणसांचा समुह एकत्र असतो आणि तो भावनिक व सांस्कृतीक दृष्ट्या एकत्र असतो. समान ध्येयाने प्रेरीत असतो. मूल्यांची समता असते. तो समुदाय एकमेकांच्या सुःखदुःखात सहभागी असतो. अशी भावनीक एकात्मता असणाऱ्या भुभागाला 'राष्ट्र' असे संबोधतात. राष्ट्रीय एकात्मता म्हणत असताना फक्त घटनात्मक व कायदेशीर एकात्मता अपेक्षीत नसते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्रांतील व्यक्तीचे मने जोडण्याची प्रक्रिया होय. राष्ट्राच्या समाजघटकांमध्ये सुखदुःखाच्या समान भावना, आपण सर्व नागरीक एकत्र आहो हे आपल्या वर्तनातून दिसणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा अनुभव होय. आपल्या देशाविषयी व आपल्यातील एकजुटीविषयी वाटणारी आपुलकी म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. देशाच्या नागरिकामध्ये आपण सर्वजण राष्ट्राचे घटक आहोत अशी भावना निर्माण होणे, अशी भावना आपोआप निर्माण होत नाहीती मुद्दाम जोपासावी लागते. आपले राष्ट्र, राष्ट्राचा इतिहास, राष्ट्रीय प्रतीके याबाबत लोकांमध्ये प्रेम आणि निष्ठा निर्माण करणे आवश्यक असते. विविधतेतील एकता हे भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे सूत्र आहे. संविधानाने सर्व भारतीयांना अधिकार दिल्यामुळे धर्म, जात, लिंग या आधारावर व्यक्ति-व्यक्तिंत भेदभाव राहिलेला नाही. त्यामुळे समाजात एकजूट निर्माण होण्यास मदत झाली.

**राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने:**

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने भारताचा विचार करताना हजारो वर्षापासून असलेली एकता नजरेआड करता येणार नाही. परंतू ब्रिटीशांच्या आगमनानंतर 'फोडा आणि राज्य करा' या कुटनीतिचा अवलंब करून भारतामध्ये हिंदू-मुस्लीम दुही निर्माण झाल्याचे दिसते. भारत स्वतंत्र झाला तेव्हा येथील आर्थिक , सामाजिक स्थिती गंभीर होती. देशाच्या फाळणीच्या परिणामस्वरूप मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लीम दंगे होऊन धार्मिक तणाव वाढीस लागला होता. फुटीरतावादी चळवळीला जोर येऊन भारतापासून विभक्त होण्याचे प्रयत्न सुरू होते. भाषावार प्रांतरचनेसाठी आंदोलने होत होती. संविधानसभेतच राष्ट्रीय भाषेच्या विवादामुळे उत्तर-दक्षिण दुही निर्माण झाली होती. अश्या स्थितीत प्रदेशिकतावाद राष्ट्रीयतेच्या विरूद्ध आकार घेत होती. स्वातंत्र्यपुर्व



CamScanner

काळापासून वंचीत जाती-जमातींनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला दूर सारण्यासाठी चळवळी निर्माण झाल्या होत्या. याचा परिणाम परंपरागत वर्चस्व असलेल्या जाती व न्याय हक्क मागणाऱ्या जातीत संघर्ष अटळ होता. थोडक्यात भारतीय स्वातंत्र आंदोलनात राष्ट्रीय एकात्मतेची रूजवणूक झालेली असली तरी स्वातंत्र्यानंतर लगेच 'आम्ही सारे भारतीय एक आहोत' अशी भावना लोकांमध्ये निर्माण व्हावी अशी कोणतीही परिस्थीती नव्हती. अज भारतात जात, धर्म सम्प्रदाय, प्रादेशिकता, भाषा, आर्थिक विषमता, अशिक्षा, लोकसंख्यावाढ, दहशतवाद, भ्रष्ट राजकीय नेतृत्व, अल्पसंख्याकांचा प्रश्न अश्या अनेक समस्या आहेत ज्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राष्ट्रीय एकात्मते बाधा निर्माण करतात. म्हणून या समस्यांचा अभ्यास करणे आवश्य आहे.

**जातीवाद:**

राष्ट्रीय ऐक्याच्या निर्मीतीमध्ये सर्वात प्रमुख अडथळा म्हणजे भारतामध्ये पुर्वापार पासून अस्तित्वात असलेली जातीव्यवस्था होय. जातीव्यवस्थेचे वैशिष्ट्ये असे की भारतामध्ये ती सर्वव्यापक आहे. खासकरून हिंदू समाजाचे जातीव्यवस्था हे एक मुलभूत वैशिष्ट्ये म्हणून नोंदविता येईल. त्याचप्रमाणे मुस्लीम, शिख, जैन व ईसाई या धर्मातसुद्धा जातीव्यवस्थेचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. जन्मजात व्यवसाय, रोटीबेटी व्यवहार बंदी व जाती-जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठतेचा भाव ही जातीव्यवस्थेची ठळक वैशीष्ट्ये सांगता येईल. माणसाला माणसापासून, समुहाला समुहापासून दूर सारणारी व शोषणावर आधारीत ही व्यवस्था भारतीय ऐक्यास बाधक ठरत आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे आगमन, घटनात्मक मुल्ये, शिक्षण व आधुनिकीकरणाने जातीव्यवस्थेला जरी खिळखिळे केले असले तरी तीच्या बदलत्या लक्षणासह जातीव्यवस्था कायम राहिली असून आर्थिक, सामाजीक व राजकीय व्यवस्थेवर तीचा प्रभाव आजसुद्धा बऱ्यापैकी आढळतो.

निवडणूका, मतदान व्यवहार, उमेदवारांची निवड, प्रशासन इत्यादी घटकांवर जातीव्यवस्थेचा प्रभाव उल्लेखनीय असाच आहे. जातीय राजकारणाचे वातावरण पोषक लोकशाहीस हितावह नसते. जात व राजकारणाचा संबंध बघताना आंध्रप्रदेशमध्ये काम्मा-रेड्डी, तामीळनाडू मध्ये ब्राम्हण-मुदलियार-गौडख, कर्नाटकमध्ये लिंगायत-ओक्कलिंग, केरळमध्ये ब्राम्हण-नायर-इजावाह, महाराष्ट्रात मराठा-ब्राम्हण-दलित, गुजरातमध्ये पाटिदार-क्षत्रीय, राजस्थान मध्ये जाट-राजपूत, बिहारमध्ये ब्राम्हण-कायस्थ-वैश्य, उत्तरप्रदेशमध्ये दलित-ब्राम्हण-जाट-राजपूत आदि जातींचा प्रभाव राजकारणावर दिसून येतो. डॉ. आम्बेडकर म्हणतात की भारतामध्ये जाती या स्वतंत्र राष्ट्रेच आहेत. आज जातीच्या आधारावर सामाजिक समूह, जात संगठन, लग्न-सोहळे, आर्थिक समुह तयार झालेले आहेत. त्यामुळे अश्या संगठीत जाती फक्त आणि फक्त स्व-जातीय हितांवर जोर देताना आढळते त्यामूळे जाती-जातीमधील तणाव-संघर्ष वाढू लागले आहे. परिणामत: देशात अधुनमधून जातीय दंगली उसळल्या जातात. यावरून भारातातील जाती हा घटक राष्ट्रीय एकात्मतेला किती मारक आहे याची प्रचिती येते.

**जमातवाद/सम्प्रदायवाद:**

वासहातिक काळापासूनच जमातवाद भारतातील एक प्रमुख सामाजिक समस्या आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही या समस्येने सांस्कृतिक विविधतेला विळखा घातल्याचे दिसून येते. धार्मिक मुलतत्ववाद या अंगानेही जमातवादाचा अभ्यास केला जातो परंतू मुलत: दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत. सर्वसामान्यांची रूढीवादीता, रूढीप्रियता, धर्मभोळेपणा याचा वापर करून एखादा धार्मिक समुदाय दुसऱ्या धार्मिक समुदायाविरूद्ध धर्माच्या आधारावर संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो तेव्हा जमातवादाचा जन्म होतो. त्यातून धार्मिक राजकारण आकार घ्यायला लागते. जमातवादामध्ये एखाद्या धार्मिक समुहाच्या धर्मअस्मितेला फुंकर घालून त्या अस्मितेचा वापर राजकारणासाठी केल्या जातो. ब्रिटीश शासनाच्या कूटनीतितून जन्माला आलेली जमातवादाची समस्या राष्ट्रीय ऐक्य बनण्याच्या प्रक्रियेत असलेल्या भारतासमोरील मुख्य गतिरोधक बनून राहिली. शासनसंस्थेद्वारे जमातवादी प्रक्रियेला गोंजारण्यातून समस्या अधिक बळकट होत गेली. परिणामत: राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही अडचणीत आल्याचे दिसते.

**प्रादेशिकतावाद:**

भारतीय राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात जी अनेक आव्हाने आहेत त्यात प्रांतवाद वा प्रादेशिकतावाद हा महत्वाचा घटक आहे. देशातील एखाद्या विशिष्ट भुभागावर देशापेक्षा अधिक प्रेम वा निष्ठा असणे म्हणजे प्रादेशिकतावाद होय. एखाद्या विभागातील जनतेत आपल्यावर अन्याय झाला ही दाबून ठेवलेली भावना उफाळून आली की ती भावना प्रादेशिकतावाद या नावाने ओळखली जाते. प्रांतवाद निर्माण होण्यास भौगोलिक कारण सोबतच केंद्र-राज्य संघर्ष, आंतरराज्यीय विवाद, विशिष्ट भुभातील आर्थीक मागासलेपण, ऐतिहासीक व सांस्कृतिक भिनत्व, भाषा व संकुचित राजकीय स्वार्थ यापैकी कुठलाही घटॅक



CamScanner

कारणीभूत असू शकतो. परिणामस्वरूप संघराज्यातून फुटून बाहेर निघण्याच्या चळवळी (खलीस्तान चळवळ, द्रविडास्थान चळवळ, पुर्वोत्तर राज्यातील फुटीरतावादी चळवळी) भाषीक समस्या वा भाषावाद, नवीन राज्याची निर्मीती, राष्ट्रभाषेचा प्रश्न, आर्थिक विषमता इत्यादी परिणाम अनुभवास येतात. राष्ट्रीय एकात्मतेस प्रादेशिकतावादाचे वातावरण म्हणूनच पोषक मानले जात नाही.

**अल्पसंख्यांकांचे प्रश्न:**

आज देशमध्ये अल्पसंख्यांकांचे प्रश सुद्धा महत्वाचे आहेत. विभिन्न राज्यात भाषायी व धार्मिक अल्पसंख्यांकांचे वास्तव्य आढळते. मुम्बई, कोलकात्ता, दिल्ली ई. महानगरांमध्ये शासन व उद्योग जगातील बाहेरच्या राज्यातील अल्पसंख्यांकांचे वर्चस्व संघर्शास कारण ठरते. अल्पसंख्याकांच्या धार्मिक व भाषायी अस्मितेला व्यापक मान्यता प्राप्त होत नसल्याने बहुसंख्यांकविरोधी भाव त्यांच्यात उत्पन्न होऊन सामाजिक दुभंगलेपण निर्माण होते. तसेच शासन अल्पसंख्यांकांचे लांगुनचालन करते असा आरोप सतत बहुसंख्यांकांकडून होत असतो. परिणामस्वरूप अल्पसंख्यांक विरूद्ध बहुसंख्यांक असा संघर्ष उभा राहतो. ही स्थिती राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मारक ठरते.

**अत्याधिक आर्थिक विषमता:**

आर्थिक विषमता एकतेच्या विरूद्ध वतावरण निर्माण करते. आर्थिक विषमता, आर्थिक अस्थिरता, शोषक व शोषित यामधील संघर्ष ईत्यादी कारणामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहचतो. गरिब वर्गाच्या मनामध्ये साधनसम्पत्तीवर एकाधिकार प्रस्थापित करून सम्पन्न झालेल्या वर्गाच्या प्रती द्वेषभाव असणे स्वाभाविक आहे. ही द्वेषभावना फक्त गरिब आणि कष्टकऱ्यांमध्येच नसून मध्यम वर्गामध्ये सुद्धा या आर्थिक विषमते विशयी चिड निर्माण झालेली आहे. देशातील काही राज्य आर्थिक, भौगोलिक दृष्टीने मागासलेले आहेत. उदा: महाराष्ट्रापुरताच विचार केला तर महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र हा सधन प्रदेश आहे तर विदर्भ हा दुर्गम प्रदेश आहे. आज सुद्धा देशामध्ये रोजगाराच्या संधीचे वितरण व राष्त्रीय सम्पतीच्या वाटणीवरून संघऱ्श होताना दिसतो. त्यामुळे देश व समाजातील एका वर्गाच्या लोकांचे दुसऱ्या वर्गाच्या लोकांप्रती द्वेष आणि विरोधाची भावना निर्माण होत असलेली दिसून येते. अश्या परिस्थितीत राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहणे कठीण आहे.

**भ्रष्टाचार:**

सामाजिक व राजकीय प्रक्रियेची निर्धारित उद्दिष्ठ्ये साध्य करण्याच्या मार्गातील भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या आहे. नव्या भारताची जडणघडण करण्याची जबाबदारी ज्या व्यक्ती व संस्थांवर घटॅनाकर्त्यांनी सोपवली होती त्या भ्रष्त्राचाराने पोकरल्या गेल्यामूळे त्यांच्याकककडून अपेक्षीत कामगिरी बजावली जात नाही. राष्ट्रीय एकात्मतेसाठी राजकीय संस्थांनी कार्यक्षमता व विश्वासहार्यता वाढणे आवश्यक आहे. परंतू अलिकडच्या काळात राजकीय संस्थांच्या मोठ्या प्रमाणात र्‍हास होत असल्याचे दिसत आहे. या र्‍हासामागे असलेल्या अनेक कारणांपैकी भ्रष्टाचार हे एक प्रमुख कारण आहे. तात्पर्य भ्रष्टाचारामुळे राष्ट्रबांधणीच्या कार्यात गम्भीर पेचप्रसंग निर्माण झालेला आहे.

**नक्षलवाद :**

नक्षलवादी चळवळ जी माओवादी चळवळ अथवा डाव्यांची उग्रवादी चळवळ म्हणूनही ओळखली जाते तिला शेतमजूर, दलित आणि आदिवासी लोकांचे समर्थन आहे. ती चळवळ शहरी भागात विशेषतः कामगार वर्गात पसरली आहे. जिथे अन्याय, शोषण, दमन आणि राज्याकडून दुर्लक्षिले गेल्याची भावना असते, तेथे ही चळवळ यशस्वी होते. नक्षलवादी चळवळीची मुळे तेलंगणा चळवळीत(1946-51) सापडतात. तेथील शेतकऱ्यांच्या सरंजामशाही विरुद्धच्या चळवळीला प्रथमच भारतीय कम्युनिस्टांनी पाठिंबा दिला होता. सुरुवातीला या चळवळीला यश आले. परंतु भारत सरकारने जमीन सुधारणांसाठी योजलेल्या कार्यक्रमांमुळे या चळवळीचा जोर कमी झाला. 1967 मध्ये भारतातील सरंजामशाही पद्धतीच्या विरोधात पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे आंदोलन करण्यात आले. त्या चळवळीची वैचारिक बैठक ही मार्क्स-लेनिन-माओ यांच्या विचारसरणीवर आधारित असलेल्या चारू मुजुमदार यांच्या लिखाणात सापडते.

शासनाने या चळवळी विरुद्ध उचललेली पावले आणि मुजुमदार यांच्या अटकेनंतर 1970 च्या दशकात या चळवळीचा जोर कमी झाला. पुढे 1980 च्या दशकात ही चळवळ उग्रवादी स्वरूपात पुन्हा उदयाला आलेली दिसते. 2004 मध्ये वेगवेगळे नक्षलवादी गट, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्स-लेनिनवादी) आणि इतर गट एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) CPI (Maoist) स्थापन केली. मार्क्स-लेनिन-माओ यांच्या वैचारिक बैठकीच्या आधारे एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) ही राजकीय पक्षाची संघटना म्हणून पुढे आली आहे. गृहमंत्रालयाच्या निरिक्षणानुसार जहालवादी डावे गट रेल्वे, रस्ते, वीज आणि दूरसंचार यांसारख्या पायाभूत विकास कामांमध्ये दहशतीच्या वा हिंसक मार्गाने अडथळे आणतात जेणेकरून शासनाच्या



CamScanner

योजना या भागात कशा कुचकामी ठरतात याचा प्रचार ते करू शकतात. सामान्यतः जंगले अथवा दुर्गम प्रदेशात दळणवळणाची साधने नसतात. त्यामुळे तिथे सक्षम सुरक्षा व्यवस्था पोहचू शकत नाही आणि याच भागात नक्षलींचा वावर अधिक असतो

**जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद:**

भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार (Indian Independence Act, 1947) संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घ्यावयाचा होता. जम्मू-काश्मीर पाकिस्तानात सामील करण्यासाठी तेथील महाराजा हरिसिंग यांच्यावर दबाव टाकण्याकरता, पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने टोळीवाले काश्मीरमध्ये पाठवण्यात आले आणि तिथूनच जम्मू-काश्मीरमधील समस्येला सुरुवात झाली. हरिसिंग यांनी भारतात सामील होण्याच्या करारावर सही केली आणि जम्मू-काश्मीर भारतात सामील झाले.मग भारताने काश्मीरच्या संरक्षणाकरता आपले सैन्य पाठवले. यातूनच 1947-48 मध्ये पहिलेभारत-पाक युद्ध झाले. जम्मू-काश्मीरमधील नागरिकांना भारताविरुद्ध भडकवण्याच्या उद्देशाने 1965 मध्ये पाकिस्तानने घुसखोर पाठवले. 1965 मध्ये पाकिस्तानने भारतावर प्रत्यक्ष आक्रमण केले तेव्हास्थानिकांनी त्यांना सहकार्य केले नाही.

1965 मध्ये अमानुल्ला खान यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये Plebiscite Front ची स्थापना केली. या आघाडीचा एक अनधिकृत लष्करी गट नॅशनल लिबरेशन फ्रंटने जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया घडवून आणल्या. 1977 मध्ये या Plebiscite Front ला जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट (Jammu-Kashmir Liberation Front) असे नवीन नाव देण्यात आले. 1989 मध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्याची हत्या करण्यात आली आणि JKLF नेतत्कालीन गृहमंत्र्यांच्या कन्या रुबिया सैद यांचे अपहरण केले. जम्मू-काश्मीरच्या स्वातंत्र्याची मागणी ही JKLF ची प्रमुख मागणी होती. काश्मीरमधील पाकिस्तानवादी गनिमी गटांना मदत करण्यासाठी पाकिस्तानने हिज्बूल मुजाहिद्दींना तेथे पाठवण्याचा निर्णय घेतला. काश्मीर खोऱ्यात, पाकिस्तानातून आलेल्या Pan-Islamist लढवय्यांच्या प्रवेशाने तेथील बंडखोरीचे स्वरूप पालटले. वाढलेल्या इस्लामी आक्रमतेमुळे 1990 च्या दशकात काश्मिरी पंडितांवर जो अत्याचार झाला त्यामुळे काश्मिरी पंडितांनी .काश्मीरमधून स्थलांतर केले.

भारत-पाक संबंधांमध्ये सीमापार दहशतवाद हा नेहमीच सर्वांत महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. सीमेपलीकडून होणारी घुसखोरी ही जम्मू-काश्मीर मधील हिंसाचाराला जबाबदार आहे असे शासनाचे म्हणणे आहे. 2016-17 च्या गृहमंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार गेल्या पंचवीसपेक्षा जास्त वर्षांमध्ये काश्मीरमधील फुटीरतावादी हिंसाचार आणि दहशतवादाला सीमेपलीकडून मदत पुरवली जाते. यात असेही म्हटले आहे की समाज माध्यमे व विशिष्ट गटांचा वापर करून लोकांमध्ये मूलगामी विचार रुजवण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने अस्थिरता निर्माण करण्यासाठी हुरियतसारख्या विभाजनवादी गटांना सीमेपलीकडून राजकीय मदत पुरवली जाते. या संघर्षात दगडफेकीसाठी मुलांचा केलेला वापर व शाळांची केलेली जाळपोळ या अस्वस्थ करणाऱ्या घटना आहेत.

**राष्ट्रीय एकात्मततेत राज्याची भूमिका:**

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये राज्याची भूमिका खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**शांतता आणि सुव्यवस्था:**

राज्य समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करते. राज्याचा मूळ हेतू देशाचे संरक्षण हा आहे. या कार्याला 'राष्ट्र उभारणीचे' कार्य असे संबोधले जाते. राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व आंतरराष्ट्रीय वा देशांतर्गत परिस्थितीमुळे धोक्यात येऊ शकते. देशाचे संरक्षण करणे, अस्तित्व टिकवणे,संविधान आणि राजकीय व्यवस्था टिकवणे यांत राज्याची मुख्य भूमिका असते.

**आर्थिक प्रगती :** देशाच्या औद्योगिक, कृषी विकास आणि आर्थिक प्रगतीसाठी राज्याने महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे. आर्थिक स्थैर्य आणि वाढ यांतून लोकांचे आर्थिक हित साध्य करता येते. याचा अर्थ समाजवादी व्यवस्था निर्माण करणे नव्हे, तर राज्याने आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे होय.राज्याने आर्थिक प्रगती साधल्यास राष्ट्रीय एकात्मता साधण्यास फारशी अडचण जात नसल्याचा जागतीक अनुभव आहे.

**राष्ट्र उभारणी :**

समाजातील विविधतेमुळे राज्याचे विघटन होणार नाही याची काळजी राज्याने घ्यायची असते. राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेचा राष्ट्र उभारणीशी अत्यंत जवळचा संबंध आहे. राष्ट्र उभारणीमध्ये नागरिकांच्या निष्ठा या एकाच केंद्राभोवती विकसीत होतील, त्या बहुकेंद्री नसतील याची काळजी राज्याने घ्यावयाची असते.



CamScanner

**शासन :**

समाजातील लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेमधील सहभाग हे सुशासनाचे लक्षण आहे. यालाच 'लोकशाहीकरण' अथवा 'लोकसहभागी राज्य' असे म्हणतात. यातून लोकांच्या निष्ठा विकसित होऊन आम्हीसुद्धा या राज्याचे एक भाग आहोत अशी भावना लोकांमध्ये निर्माण होते. जी पुढे राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक ठरते.

**लोककल्याण :**

सामाजिक न्याय, वाजवीपणा (fairness), समानता या तत्त्वांचा वापर लोककल्याणासाठी करणे, समाजातील असमतोल दूर करून दुर्लक्षित घटकांचे दुःख दूर करणे ही राज्याची जबाबदारी आहे.राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाहीची मूल्ये, आर्थिक प्रगती आणि समाज परिवर्तन यांचा राष्ट्र उभारणीशी जवळचा संबंध आहे. प्रगतीसाठी शांतता, स्थैर्य आणि नागरी सुव्यवस्था यांची नितांत गरज असते. अनियंत्रित समाज हा आर्थिक अरिष्टाला कारणीभूत असतो. नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा हा प्रामुख्याने सुव्यवस्थेवर अवलंबून असतो. संघर्ष निवारण आणि सुव्यवस्था राखणे यामध्ये अतूट संबंध आहे. जर संघर्ष योग्यरीत्या हाताळले गेले तर शांतता, सुव्यवस्था आणि स्थैर्याला धक्का कमीत कमी पोहचतो. शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मता यांमधील राज्याची भूमिका खालील चौकटीवरून समजून घ्या. यातील पहिली पायरी ही भारतीय संविधानाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची आहे. दुसरी पायरी ही समस्येच्या सुरुवातीच्या स्तरांवर राज्याची भूमिका दर्शवते आणि तिसऱ्या पायरीवर समस्येच्या गंभीर स्वरूपाला राज्याला तोंड द्यावे.

**संदर्भग्रंथ सूची:**


1. देशमुख सुधाकर, (२००९), राष्ट्र आणि राष्ट्रवाद, पद्मगंधा प्रकाशन,पुणे.
2. गुहा रामचंद्र, (अनुवाद २०११), गांधीनंतरचा भारत,मजेस्टीक प्रकाशन, ठाणे.
3. चौसाळकर अशोक (संपादक), (२०११), धर्म, समाज आणि राजकारण, लोकवाङ:मय गृह,मुंबई.
4. पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र 'भारतीय लोकशाही: अर्थ व व्यवहार', डायमंड पब्लिकेशन, पुणे
5. सुमंत यशवंत, 'भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व: काही निरिक्षणे', विचारमंथन संशोधन पत्रिका, जानेवारी 2013, अंक 18, अथर्व प्रकाशन, जळगाव.
6. बेडकिहाळ, किशोर (संपा) (2005): परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, लोकवाङ:मय गृह, मुंबई.
7. जावडेकर, शं. द. (2001): आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे
8. तळवळकर, गोविंद (1997): सत्तांतर: 1947, खंड-3, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
9. बेडकिहाळ, किशोर (संपा) (2005): परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, लोकवाङ:मय गृह, मुंबई.
10. सरकार, सुमित (2015) (अनु: सुशीला डोभाल): आधुनिक भारत 1885-1947, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.




CamScanner